सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. १४ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक १०२ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







## रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी सोनाली मिश्रा

### पहिल्यांदाच झाली महिला अधिकाऱ्याची नियुक्ती



नवी दिल्ली : रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी पहिल्यांदाच महिला अधिकाऱ्याची नियुक्ती झाली आहे. वरिष्ठ आयपीएस अधिकारी सोनाली मिश्रा यांची रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने या निर्णयाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. सोनाली मिश्रा ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत म्हणजेच सेवानिवृत्त होईपर्यंत रेल्वे सुरक्षा दलाच्या महासंचालकपदी कार्यरत राहणार आहेत.

रेल्वेची संपत्ती आणि रेल्वे प्रवाशांचे संरक्षण यासाठी रेल्वे सुरक्षा दल कार्यरत आहे. या दलाचे नेतृत्व वरिष्ठ आयपीएस अधिकारी सोनाली मिश्रा करणार आहेत. केंद्र सरकारने १९५७ मध्ये एक अधिसूचना जारी करुन रेल्वे सुरक्षा दलाची स्थापना केली. या दलाला १९६६ मध्ये रेल्वेच्या आणि प्रवाशांच्या संपत्तीची नासधूस तसेच चोरी करणाऱ्यांना अटक करण्याचे तसेच त्यांची चौकशी करण्याचे आणि त्यांच्या विरोधात कोर्टात खटले चालवण्याचे अधिकार मिळाले. पुढे २० सप्टेंबर १९८५ रोजी रेल्वे सुरक्षा दलाला केंद्रीय सशस्त्र दलाचे स्वरुप देण्यात आले. सोनाली मिश्रा या १९९३ च्या मध्य प्रदेश कॅडरच्या आयपीएस अधिकारी आहेत. त्यांची २०२१ मध्ये पंजाबमध्ये भारत - पाकिस्तान सीमेवर नियुक्त केलेल्या महिला जवानांच्या कमांडर या पदावर नियुक्ती झाली. याआधी सोनाली मिश्रा यांनी काश्मीरमध्ये पोलीस महानिरीक्षक म्हणून काम केले होते. त्यांनी काही काळ सीमा सुरक्षा दलाच्या गुप्तचर यंत्रणेचेही नेतृत्व केले होते. तसेच सीमा सुरक्षा दलाच्या अतिरिक्त महासंचालपदाचीही जबाबदारी हाताळली आहे. विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपतींनी सोनाली मिश्रा यांना पोलीस पदकाने गौरविले आहे. तसेच सोनाली मिश्रा यांना सागरी क्षेत्रातील पोलीस सेवेसाठीही पदक देऊन गौरविण्यात आले आहे. अनेक महत्त्वाची पदे समर्थपणे हाताळलेल्या सोनाली मिश्रांचा वेगवेगळी पदके देऊन वेळोवेळी गौरव करण्यात आला आहे.

## बिहारच्या मतदारयादीत बांगलादेश, म्यानमार, नेपाळच्या नागरिकांची नावे

पाटणा : बिहारच्या विधानसभेचा कार्यकाळ लवकरच पूर्ण होणार आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून निवडणूक आयोगाने बिहारमध्ये मतदारयादीची सखोल तपासणी सुरू केली आहे. या तपासणीत धक्कादायक माहिती हाती आली आहे. बिहारच्या मतदारयादीत बांगलादेश, म्यानमार, नेपाळच्या नागरिकांची नावं आढळली आहेत. ही नावं यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यादीतील या गंभीर चुकांसाठी निवडणूक आयोगाने ३५ बीएलओ आणि २६ सुपरवायझर यांचे वेतन स्थगित केले आहे. या अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशीचे निर्देश देण्यात आले आहेत.

निवडणूक अधिकारी बिहारमध्ये घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करत आहेत. ही तपासणी सुरू असतानाच बनावट कागदपत्रांच्या मदतीने अनेक विदेशी नागरिकांनी यादीत नावाचा समावेश करुन



घेतल्याचे आढळले आहे. ही माहिती मिळताच निवडणूक आयोगाने मतदारयादीत घुसखोरी करणाऱ्या बांगलादेश, म्यानमार, नेपाळच्या नागरिकांची नावं यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. निवडणूक आयोगाची धडक कारवाई सुरू झाल्यापासून विरोधी पक्षांमध्ये अस्वस्थता दिसत आहे. काँग्रेसचे नेते निवडणूक आयोगाची कारवाई थांबवण्यासाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण न्यायालयीन पातळीवर त्यांना पुरते अपयश आल्याचे दिसत आहे. निवडणूक आयोग ३० सप्टेंबर २०२५ रोजी बिहारच्या मतदारांची सुधारित यादी प्रसिद्ध करणार आहे. ही यादी प्रसिद्ध करण्याआधी बोगस मतदारांची नावं वगळण्याचे काम सुरू आहे.

बिहार विधानसभेचा कार्यकाळ २२ नोव्हेंबर २०२५ रोजी संपणार आहे. याआधी निवडणूक घेऊन निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित आहे. यामुळे बिहारमध्ये मतदार यादीच्या छाननीचे काम प्राधान्याने सुरू करण्यात आले आहे. बिहारमध्ये विधानसभेच्या २४३ जागांसाठी निवडणूक होणार आहे. पण या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच मतदार यादी छाननीच्या प्रक्रियेमुळे विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरल्याचे दिसत आहे. आसाम, पद्दुच्चेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल येथे २०२६ मध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. यामुळे बिहार पाठापोठ या राज्यांमध्येही मतदार यादीच्या छाननीचे काम सुरू केले जाणार आहे.

विरोधकांनी ९ जुलै रोजी बिहारमध्ये निवडणूक आयोगाच्या कामाला विरोध म्हणून बंद पुकारला होता. हे आंदोलन झाले तरी निवडणूक आयोगाचे काम थांबलेले दिसत नाही. आयोगाच्या कामामुळे सत्ताधाऱ्यांऐवजी विरोधकांमध्ये चिंतेचे वातावरण दिसत आहे.

## भाजपाचा माजी आमदार असलेल्या अभिनेत्याचा मृत्यू

### तीन दिवसांपूर्वी साजरा केलेला वाढदिवस



हैदराबाद : भाजपाचे माजी आमदार आणि ज्येष्ठ दाक्षिणात्य अभिनेते कोटा श्रीनिवास राव यांचे निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांनी तीन दिवसांपूर्वीच वाढदिवस साजरा केला होता. रविवार १३ जुलै २०२५ रोजी हैदराबादमधील फिल्मनगर येथील घरी कोटा श्रीनिवास राव यांनी अखेरचा श्वास घेतला.

कोटा श्रीनिवास राव यांचा जन्म १० जुलै १९४२ रोजी आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील कांकीपाडू येथे झाला. त्यांनी १९७८ मध्ये 'प्रणम खरेधू' या चित्रपटातून मनोरंजनसृष्टीत पदार्पण केले. आपल्या चार दशकांपेक्षा मोठ्या कारकिर्दीत त्यांनी ७५० पेक्षा जास्त चित्रपटांत काम केले. त्यांनी साकारलेल्या खलनायकाच्या भूमिका जास्त गाजल्या. तेलुगू चित्रपटसृष्टीत त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. निवडक चित्रपटांतून त्यांनी सकारात्मक आणि विनोदी भूमिकाही साकारल्या.

चित्रपटसृष्टीत यश मिळवणाऱ्या कोटा श्रीनिवास राव यांनी १९९० च्या दशकात भाजपात प्रवेश केला. ते १९९९ मध्ये विजयवाडा पूर्व विधानसभा मतदारसंघातून आंध्र प्रदेश विधानसभेवर निवडून आले. सिनेविश्वात येण्याआधी काही काळ बँकेत नोकरी केलेल्या कोटा श्रीनिवास राव यांनी पुढे अभिनय क्षेत्रात प्रभावी कामगिरी केली.

भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानासाठी कोटा श्रीनिवास राव यांना २०१५ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोटा श्रीनिवास राव यांना आधी डॉक्टर व्हायचे होते, परंतु अभिनयाच्या त्यांच्या आवडीमुळे हे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही.

आर. चंद्रू यांचा 'कबजा' हा कोटा श्रीनिवास राव यांचा शेवटचा चित्रपट होता. या चित्रपटात उपेंद्र राव, शिवा राजकुमार, किचा सुदीप, श्रिया सरन आणि मुरली शर्मा सारखे कलाकार होते.

## सोयगावात एकाच रात्री तीन दुकाने फोडून चोरटे सी.सी.टी.व्ही सह गायब

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१३ जुलै

सोयगाव शहरात मध्यरात्री दुचाकी वाहनाने रेकी करून अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्री शहरात तीन ठिकाणी घरफोड्या करत दुकानांची कुलूप कोयंडा तोडून तिन्ही ठिकाणावरून ७७ हजार रु रोकड व तीन हजार रु चे सी.सी.टी.व्ही.कॅमेरे असा एकूण ८० हजार रु मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना शुक्रवारी(दि.११)रात्री बारा ते एक वाजेच्या सुमारास सोयगावात घडली आहे.या प्रकरणी सोयगाव पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री नऊ वाजता अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्ह्यांची नोंद घेण्यात आली. दरम्यान चोरट्यांनी चोरी केलेल्या ठिकाण चे सी.सी. टी.व्ही.कॅमेरे च चोरी केल्याने



चोरीचा पुरावा नष्ट केला आहे. तातडीने सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या सह उपनिरीक्षक गजानन आरेकर,राजू बरडे,सादिक तडवी,रवींद्र तायडे,आदींचे पथक शुक्रवारी रात्री सात वाजता शेंदूर्णी, फर्दापूर,येथील रस्त्यावरील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तपासणी साठी रवाना झाले होते. दरम्यान शहरातील सोयगाव-शेंदूर्णी बाय पास रस्त्यावरील तुकाराम तायडे यांच्या सोयगाव येथील शेंदुर्णी जाणारे रोडवरील आदिनाथ ट्रेडिंग कंपनीच्या दुकानांमधील लॉकर मधील ६० हजार रुपये व सीसीटीव्ही कॅमेरा डीव्हीआर व तसेच युवराज आगे यांची शेंदुर्णी रोडवरील हॉटेल साम्राज्य येथून लॉकर मधील वीस हजार रुपये व सीसीटीव्ही कॅमेरा डीव्हीआर व शेंदुर्णी बायपास रोड वर असणारे अशोक कॉम्प्लेक्स येथील दुकानाचे ड्रॉवर मधून ७ हजार रुपये अज्ञात चोरट्याने दुकानाचा कोंडा कटरच्या साह्याने कापून दुकानात हॉटेलमध्ये आत प्रवेश करून चोरून नेले. तुकाराम तायडे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून सोयगाव पोलीस ठाण्यात अज्ञात विरुद्ध गुन्ह्याची नोंद घेण्यात आली आहे.

### चोरट्यांनी शिताफीने केली चोरी

सोयगाव शहरात अज्ञात दुचाकी रात्री एक वाजता रेकी करतांना दुसऱ्या अन्य सी.सी.टी.व्ही.मध्ये कैद झाली आहे. यावरून चोरट्यांनी शहराचा फेरफटका मारून ही चोरी केली आहे.दरम्यान चोरीच्या घटनास्थळवरून सी.सी.टी. व्ही फुटेज ही चोरी केले.यावरून चोरटे अट्टल असल्याचा अंदाज पोलीसांनी केला आहे.याप्रकरणी सोयगाव शहरात शुक्रवारपासून रात्रीची गस्त वाढविली आहे.सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गजानन आरेकर,राजू बरडे,रविंद्र तायडे,सादिक तडवी,गजानन दांडगे आदींचे पथक तपास करत आहे असे सांगितले.






## माजी सरपंचाची निर्घृण हत्या करणारे आरोपी जेरबंद

### अवघ्या २४ तासाच्या आत आरोपींच्या आवळल्या मुसक्या,पूर्ववैमनस्यातून केली हत्या

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१३ जुलै - तालुक्यातील सिरजगावा येथील माजी सरपंचाची दि.१२ रोजी निर्घृणपणे हत्या झाली होती,त्या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली होती

सिरजगाव येथील माजी सरपंच राजाराम उर्फ राजु भावसिंग चुंगडे वय-४७ वर्षे हे त्यांचे शेतातील घरासमोरील खडीवर मोबाईल बघत बसले असतांना अचानक तीन ईसमांनी पाठीमागुन येऊन धारदार कोयत्याने डोक्यात, हातावर ०७ ते ०८ वार करुन जागीच ठार करून मारेकरी मोटार सायकलवरुन फरार झाले. मयताचा मुलगा सुरज राजाराम चुंगडे रा. सिरसगाव यांचे फिर्यादी वरुन कन्नड ग्रामिण पोलीस स्टेशनमध्ये खुनाचा गुन्हा दाखल झाला होता.



पोलिस अधिक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलिस अधिक्षक अन्नपूर्णा सिंह,उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड,यांनी घटनास्थळी भेट देत तपासाची चक्रे फिरवत स्थानिक गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक विजयसिंह राजपुत,सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार यांनी आरोपीच्या शोधात पथके रवाना केली,याबाबत गावातील पार्श्वभुमी व अलीकडील काही दिवासापुर्वी गावात घडलेल्या गुन्हयांच्या घटणेबाबत सखोल चौकशी केली असता मिळालेल्या गोपणीय माहितीच्या आधारे आनंद अमर राजपूत वय-२५ वर्षे रा. सिरसगाव ता. कन्नड यास ताब्यात घेऊन गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्याने गुन्हा कबुल करुन माजी सरपंच राजाराम उर्फ राजु भाऊसिंग चुंगडे यास त्याचे साथीदार १) समीर समद कुरेशी वय-२० वर्षे रा. सिरसगांव ता. कन्नड, २) इरफान शकील शहा वय-२० वर्षे दोघे रा. सिरगाव ता. कन्नड यांचेसह मिळून कोयत्याने डोक्यात वार करुन जिवंत ठार मारल्याची कबुली दिली.समीर समद कुरेशी इरफान शकील शहा, यांना श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथून ताब्यात घेण्यात आले,

राजाराम उर्फ राजू भाऊसिंग चुंगडे यांनी आरोपी अमर राजपुत यास एक ते दिड वर्षापुर्वी मारहान केली होती त्याचा राग मनात ठेवल्याने,तर समीर कुरेशी, याचेवर दाखल अ‍ॅट्रॉसीटीच्या गुन्हात मदत न केल्याने, तर ईरफान शहा याने सदर मयत हे नेहमी कब्रस्तानच्या जागेच्या वादावरुन आमच्या समाजाला मदत करत नाहीत. या पूर्ववैमनस्यातून खून केला असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

अधिक तपास पोलिस अधिक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलिस अधिक्षक अन्नपूर्णा सिंह,उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ.रामचंद्र पवार हे करत आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जपा आरोग्य, रहा निरोगी हाच आहे जीवनाचा खरा मुलमंत्र :राजुळे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आपण स्वतःसाठी वेळ काढायला विसरतोय. सकाळी उठायचा आळस, व्यायाम करायला कंटाळा, आणि मग हळूहळू येणारे आजारही आपल्या सवयींचीच परिणिती आहे. हेच लक्षात घेऊन 'आपलं आरोग्य - आपली जबाबदारी' या जनजागृती मोहिमेअंतर्गत सामाजिक कार्यकर्ते संजय राजुळे यांनी सन २०२२ पासून एक आगळीवेगळी, भावस्पर्शी आणि प्रेरणादायी मोहीम सुरू केली आहे.

या उपक्रमाअंतर्गत ते दररोज सकाळी स्वतः कॉल करून लोकांना उठवतात, मोटिवेट करतात आणि त्यांच्या आरोग्याच्या प्रवासाला सकारात्मक सुरुवात करून देतात.

विशेष म्हणजे, ज्यांना सकाळी उठायला आळस वाटतो, वेळेवर जाग येत नाही - अशा व्यक्तींना संजय राजुळे स्वतः फोन करून जागं करतात आणि व्यायामासाठी प्रेरणा देतात. कोणतीही फी नाही, कोणताही वैयक्तिक स्वार्थ नाही - फक्त तुमचे आरोग्य सुधारावे, तुमचे आयुष्य बदलावे यासाठी मनापासूनची सेवा करताना दिसून येतात. कारण, आजचा आळस उद्याचं दुखणं होऊ शकतो. डायबेटीस, बीपी, हार्ट प्रॉब्लेम, मोटापा, सांधेदुखी यासारख्या आजारांची सुरुवात आपणास कळतही नाही, आणि शरीर हळूहळू साथ देणं थांबवतं. हे टाळायचं असेल तर दिवसातून फक्त ४५ मिनिटं स्वतःसाठी द्या. तुमचं शरीर, मन आणि भवितव्य तुमचे आभार मानेल.

या मोहिमेमुळे आज हजारो लोकांची जीवनशैली सुधारली आहे. २ लाखांहून अधिक लोकांपर्यंत ही जनजागृती पोहोचली आहे. त्यात आणखी एक विशेष उपक्रम म्हणजे - ४०० हून अधिक नियमित व्यायाम करणाऱ्यांच्या मुलाखती घेऊन, त्या मुलाखती व्हिडिओच्या स्वरूपात अशा लोकांपर्यंत पोहोचवल्या जातात जे अजूनही व्यायाम सुरू करत नाहीत असे राजुळे म्हणाले.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## प्लास्टिकविरोधात पालिकेची मोहीम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जुलै -** महापालिकेने बंदी असलेल्या प्लास्टिकच्या विरोधात धडक मोहीम हाती घेतली आहे. आयुक्त मानसी मीना व उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या आदेशानुसार पालिकेच्या स्वच्छता विभागाने ही कारवाई केली. या मोहिमेंतर्गत शहराच्या विविध भागातून ९ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असून, १६ हजार रुपयांचा दंडही वसूल करण्यात आला आहे.

शहरात सर्रासपणे बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर आयुक्तांनी कारवाईचे आदेश दिले होते. या आदेशानुसार, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभागप्रमुख रमाकांत पिडगे, प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख, शिवराज शिंदे, डी. एस. सोनवणे, रवी कांबळे आदींनी गंजगोलाई आणि औसा रोड परिसरात विशेष मोहीम राबवली.

## १४७ प्राण्यांना मोफत लसीकरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जुलै -** जानवळ (ता. चाकूर) येथे शुक्रवारी (दि. ११) रेबीजसारख्या प्राणघातक विषाणूजन्य रोगावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लातूरचा पशुसंवर्धन विभाग व रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलतर्फे श्वान, मांजरीसाठी मोफत लसीकरण करण्यात आले. यावेळी १४७ श्वान व मांजरींना लसीकरण केले.

१४७ पैकी १२५ श्वानांना लस देण्यात आली. २२ श्वानांवर उपचार करण्यात आले. या शिबिरात पशुसंवर्धनचे सहाय्यक आयुक्त डॉ. सुधाकर साळवे, चाकूरचे पशुधन विकास अधिकारी डॉ. बालाजी देवकते, परभणीच्या वशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नांदेडकर, सरपंच कुसंगे, पशुधन पर्यवेक्षक अनिल पांडोळे, कुंभार, जयश्री वाटकर यांनी सहकार्य केले. जिल्हा परिषदेने नगर परिषद, महानगरपालिका व ग्रामपंचायतींच्या सहकार्याने संपूर्ण जिल्ह्यात मोफत लसीकरण मोहीम राबविण्याचे निर्देश दिले. रेबीज प्रतिबंधक लसीकरण ही फक्त प्राण्यांची काळजी नव्हे, तर मानवी आरोग्याचीही सुरक्षितता आहे. यासाठी नागरी, ग्रामीण दोन्ही पातळ्यांवर मोहीम प्रभावीपणे पोहोचवली गेली पाहिजे, असे जि. प.चे धोरण आहे.

## शिवाजीराव कव्हेकर स्वारातीम विद्यापीठ सल्लागार परिषदेवर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जुलै -** येथील जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांची नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेवर नियुक्ती करण्यात आली आहे.

जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून लातूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे या जिल्ह्यांसह राज्यभरात अनेक ठिकाणी शैक्षणिक संस्था उभारून त्या भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नमध्ये जेएसपीएम शिक्षण संस्थेचे योगदान मोलाचे आहे. १९८३ सालापासून शिक्षण क्षेत्रात केलेल्या अलौकिक कार्याची दखल घेऊन कव्हेकर यांची स्वामी रामानंद तीर्थ मराडवाडा विद्यापीठ पंचवार्षिक बृहत विकास आराखडा सल्लागार परिषदेच्या सदस्यपदी निवड करण्यात आलेली आहे. निवडीबद्दल सर्व क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## महाराष्ट्र जनएकता संघटनेचे भीक मांगो आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जुलै -** मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाने कर्ज मंजूर करून आठ महिन्यांपूर्वी लाभार्थ्यांच्या सातबारावर बोजा चढविला. मात्र अजूनही रक्कम दिली नसल्याने महाराष्ट्र जनएकता संघटनेच्या वतीने लातुरात महामंडळाचे लक्ष वेधण्यासाठी भीक मांगो आंदोलन करण्यात आले. जमा झालेली रक्कम जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून महामंडळाला पाठविण्यात आली.

राज्य, केंद्र शासनाने महामंडळाला तत्काळ निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इरफान शेख, उपाध्यक्ष खाजा शेख, सचिव मिन्हाज शेख, कार्याध्यक्ष जावेद शेख, नाजम शेख, उपाध्यक्ष वसीम शादुल शेख, मेहराज सिद्दीकी, अकरम पठाण आदिंची उपस्थिती होती.

# अवैध संपत्ती कमवणे व टिकवण्यासाठी पक्षांतर सुरु

### बी. जी. कोळसे-पाटील यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जुलै -** जनसुरक्षा विधेयक लोकशाही मूल्यांची आणि घटनात्मक अधिकारांची पायमल्ली करणारे असून, याला विरोध केला पाहिजे. आज एकीकडे सर्वसामान्य जनता आम्हाला जगू द्या, अशी विनवणी करत आहे. तर दुसरीकडे अवैध संपत्ती टिकवणे व कमवणे यासाठीच निर्लज्जपणे पक्षांतर होत असून, ही गंभीर बाब आहे, असे प्रतिपादन माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे -पाटील यांनी केले.



बिजांकूर विचार परिषदेतर्फे शुक्रवारी सायंकाळी येथील दयानंद सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील होते. मंचावर ज्येष्ठ प्रबोधनकार सत्यपाल महाराज उपस्थित होते.

यावेळी माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे-पाटील म्हणाले, कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटना किंवा त्यासारख्या संघटना या व्याख्येमुळेच महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक - २०२४ हे जनसुरक्षाऐवजी जन-असुरक्षा विधेयक आहे. त्यामुळे त्यास विरोध केला पाहिजे. वर्ण आणि जातीव्यवस्था हे दुःखाचे मूळ असून, बदल घडवायचा असेल तर सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत. घटनेतील धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद हा मुख्य गाभा पूर्वीच होता. त्याची स्पष्टता इंदिरा गांधींनी केली. त्यामुळे विनाकारण वादळ उठवण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज देशात विविध जाती आणि धर्मांमध्ये कट्टरतेची चढाओढ लागली आहे. आज सर्वसामान्य जनता आम्हाला जगू द्या, अशी विनवणी करत आहे. तर अवैध संपत्ती टिकवणे व कमवणे यासाठीच निर्लज्जपणे पक्षांतर होत असून, ही गंभीर बाब आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी सत्यपाल महाराज यांनी आपल्या परखड प्रबोधनातून व्यवस्थेवर आसूड ओढत सभागृहाला मंत्रमुग्ध केले.

सूत्रसंचालन प्रा. संभाजी नवघरे व ॲड. अभिलाषा गवारे यांनी केले. आभार ॲड. उदय गवारे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ. रमेश भराटे, ॲड. विजय जाधव, ॲड. गोविंद सिरसाठ, बाळासाहेब यादव, अभिमन्यू जगदाळे, विक्रम माकणीकर, वैभव तळेकर, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. जयद्रथ जाधव, नितीन पवार, ॲड. प्रशांत काळदाते, ॲड. जैनू शेख, धर्मराज पाटील, गणेश बेळंबे, ॲड. हरी निटुरे, ॲड. गणेश यादव यांच्यासह परिषदेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## युवा प्रशिक्षणार्थींना कायम रोजगार द्यावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ जुलै -** मुख्यमंत्री युवा कार्य योजनेअंतर्गतच्या राज्यातील १ लाख ३४ हजार प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार द्यावा, या प्रशिक्षणार्थींचे मानधन वाढविण्यात यावे, यासह विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी सहायक संघटनेच्या वतीने मुंबईतील विधान भवनावर सोमवारी मोर्चा काढण्याचा इशारा संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर यांनी पत्रपरिषदेत शनिवारी दिला. कांही मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिकेत मांदळे, गोविंद टोम्पे, शुभम पांचाळ, आकाश सावंत, गंगाधर कुमठेकर, सुजितकुमार शिंदे आदी उपस्थित होते.

## विस्तारित नवीन रुग्णालयाचे काम वेळेत, गुणवत्तापूर्ण करावे

### माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने पटेल चौक भागात उभारण्यात येत असलेल्या विस्तारित स्त्री व बाल रुग्णालय बांधकामाची माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांनी तिथे जाऊन शनिवारी पाहणी केली. हे बांधकाम दर्जेदार व लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना केल्या.

यावेळी माजी मंत्री, आ. अमित देशमुख म्हणाले की, सदरील विस्तारित रुग्णालय मी वैद्यकीय शिक्षण विभागाचा मंत्री असताना मंजूर करण्यात आले आहे. हे रुग्णालय जवळपास १०० कोटी रुपये खर्च करून अद्ययावत सोयीसुविधांसह उभारण्यात येणार आहे. हे २०० खाटांचे हे रुग्णालय आहे. शहर आणि जिल्ह्यातील महिला व बालकांना चांगले उपचार मिळावेत, हा या रुग्णालय उभारणीमागील उद्देश आहे.

यावेळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, ॲड. किरण जाधव, बोरवटकर, योगेश पाटील, ॲड. समद पटेल, ट्रॅटीवन शुगरचे व्हाइस चेअरमन विजय देशमुख, गोरोबा लोखंडे, ॲड. गोपाळ बुरबुरे, सत्तार शेख, अभिषेक पतंगे, दगडूअप्पा मिटकरी, इमरान सय्यद, महेश काळे आदी उपस्थित होते.

## जनसुरक्षा विधेयकामुळे बाबासाहेबांच्या विचारांना तिलांजली : उदय गवारे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** जनसुरक्षा विधेयकामुळे बाबासाहेबांनी दिलेल्या शिका, संघर्ष करा व संघटीत व्हा या विचारांना तिलांजली दिली जात असल्याचे भाई उदय गवारे यांनी म्हटले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकार गवारे यांनी पुढे म्हटले आहे की, पिढ्यान पिढ्या अज्ञानामुळे अत्याचाराला बळी पडलेल्या समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र बहुजनास दिला.भारतीय राज्य घटनेत समानतेचा,विचार स्वातंत्र्याचा हक्क दिला जेणेकरून आज देशभर बहुजनामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले जागृती आली.

समाज संघटित होऊन अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध संघर्ष करु लागला परंतु हा संघर्ष देशात आणि राज्यात सत्तेत असलेल्या राज्यकर्त्यांना खपत नाही ,म्हणूनच अनेक कायदे अस्तित्वात असताना देखील शहरी नक्षलवाद संपवण्याची वल्गना करुन जाणीवपूर्वक महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ मंजूर करण्याचा निर्धार युती सरकारने केलेला आहे .दुर्दैवाने संयुक्त समितीच्या कामकाजाप्रसंगी विरोध पक्षाच्या आघाडीतील प्रमुख पक्षाच्या आमदारांनी प्रभावी भूमिका न मांडल्यामुळे प्रस्तावित विधेयकात, कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या व त्यासारख्या संघटनांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांचा प्रभावी प्रतिबंध करण्यासाठी विधेयक आहे, असे सांगून जनसामान्यांसाठी काम करणाऱ्या संघटनांना प्रतिबंध करण्याचे अनिर्बंध अधिकार शासनाकडे येणार आहेत. हा कायदा जनसुरक्षा नसून केवळ शासन सुरक्षित राहण्यासाठीच केलेला कायदा आहे. या कायद्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना तिलांजली दिल्याचे ते म्हणाले.

## गटशिक्षण अधिकाऱ्याला बडतर्फ करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** निलंगा पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड यांच्या मनमानी, तुघलकी, अनागोंदी कारभाराची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करून त्यांना सेवेतून तत्काळ बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी छावा संघटना व भीम आर्मी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, निलंगा पंचायत समिती येथे कार्यरत असलेले गटशिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड हे मागील तीन वर्षापासून येथेच कार्यरत आहेत.

ते अत्यंत बेजवाबदार पणाचे वर्तन करतात त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या तुघलकी कार्यपद्धतीमुळे निलंगा तालुक्यातील सामान्य कुटुंबातील मुले/मुली शिक्षण घेत असलेल्या अनेक गावातील जिल्हा परिषद शाळा डबघाईस आलेल्या आहेत. बहुतांश शाळांमधील गुणवत्ता ढासळलेली आहे. शिवाय ते त्यांच्या वैयक्तिक स्वार्थासाठी त्यांच्या मनमानी कार्यपद्धतीमुळे ते येथील काही मुठभर चांडाळ चौकडीला हाताशी धरून आजपर्यंत चुकीचे निर्णय घेत आलेले आहेत.

त्यांच्या समंधातील काही शिक्षकांच्या सोयीसाठी प्रामाणिक कार्यक्षम शिक्षकांवर अन्याय करण्याचा त्यांनी धडाका चालू ठेवलेला आहे. त्यांच्या या चुकीच्या वर्तनाने निलंगा तालुक्याचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे. पर्यायाने गरिबांची/सामान्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. त्यामुळे अनेक पिढ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या सर्व बाबीला सर्वस्वी निलंगा पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी सुरेश गायकवाड हेच कारणीभूत व जवाबदारही आहेत. ते काही शाळांमधून बेसिस्त वर्तन करणाऱ्या शिक्षकांची पाठराखण करण्यास सुरेश गायकवाड हे माहिर आहेत.

याबाबतचे ज्वलंत उदाहरण सांगायचे म्हटले तर निलंगा तालुक्यातील मौजे गुऱ्हाळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वादग्रस्त व राडेबाज शिक्षक सपकाळे पांडुरंग तुकाराम हे मागील अनेक वर्षापासून कार्यरत असून हे शिक्षक शाळेत बेशिस्त वर्तन करून शालेय शिस्तीचा भंग करीत असल्याबाबत या शाळेच्या मुख्याध्यापकाने गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती निलंगा यांच्याकडे त्या शिक्षका बद्दल अनेकवेळा लेखी तक्रारी देऊन कळविलेले आहे. मात्र संबंधित गट शिक्षण अधिकारी हे त्या शिक्षकाची जाणीवपूर्वक पाठराखण करीत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनावर छावा संघटनेचे निलंगा तालुका अध्यक्ष तुलसीदास साळुंके व भीम आर्मी चे तालुका अध्यक्ष अतुल सोनकांबळे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जिल्ह्यातील अनेक गावात डिजिटल नकाशे उपलब्ध

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** जिल्ह्यातील ९०८ वाडी, तांडे गावांचे ड्रोनद्वारे भूमापन करण्यात आले असून, काही गावांमध्ये डिजिटल नकाशाही उपलब्ध झाला आहे. यामुळे गावठाणातील अनेक घरांवर मालकी हक्क लागला असून, विविध योजनांचा लाभ घेता येणार आहे. तसेच घरावर कर्जही घेता येणार आहे. जिल्ह्यात १ लाख १५ हजार ७३१ जणांचा मालकी हक्क लागला आहे.

भूमी अभिलेख कार्यालयामार्फत 'स्वामित्व' योजना राबविण्यात येत आहे. ही योजना ग्रामीण भागातील घरांच्या मालकीचे अधिकार निश्चित करण्यासाठी आणि मालमत्तेचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी करण्यासाठी आहे. या योजनेतून ड्रोनच्या सहाय्याने गावांचे भूमापन करून डिजिटल नकाशा देण्यात येणार आहे.

ही योजना गेल्या एक वर्षापासून राबविण्यात येत आहे. ड्रोनच्या सहाय्याने भूमापन केल्यास गावठाणातील नागरिकांचे घर नावे होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. अनेक गावांतील घरे असलेल्यांच्या हक्कांची नोंद देणे आणि त्यांना प्रॉपर्टी कार्ड देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

ड्रोन वापरून सर्व ग्रामीण मालमत्तांचे सर्वेक्षण करणे आणि प्रत्येक गावासाठी नकाशे तयार करता येणार आहेत. यामुळे मालमत्तेवरील वाद कमी होणार आहेत. तसेच ज्यांची मालमत्ता आहे, त्यांना त्या मालमत्तेवर बँकेचे कर्ज काढता येणार आहे.

## किशोरवयीन मुलींना मासिक पाळीचे समुपदेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** मासिक पाळी दरम्यान आरोग्यपूर्ण व्यवस्थापनासंबंधी मुलींना मूलभूत माहिती व्हावी व भविष्यातील आरोग्याच्या समस्या दूर करण्याच्या दृष्टीने लातूर शहर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी व उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या संकल्पनेतून मासिक पाळी समुपदेशन व मार्गदर्शन शिबिर घेण्यात येत असून या महिन्यात एकूण ५६३ मुलींचे समुपदेशन करण्यात आले आहे.



मनपा आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र आणि नागरी आयुष्मान आरोग्य केंद्र अंतर्गत विशेष जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. मुलींमध्ये वाढत्या वयात होणारे शारीरिक बदल, मुख्यत्वे वयाच्या १० ते १४ वर्षा दरम्यान शारीरिक तसेच मानसिक बदलांमधील अवस्था व मासिक पाळी विषयी पौगंडावस्थेतील मुलींना समुपदेशन करणे, व भविष्यातील आरोग्याच्या समस्या कमी करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

मासिक पाळी म्हणजे काय ? मासिक पाळी दरम्यान काय काळजी घ्यावी ? मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या समस्या कशा हाताळाव्यात ?, यासह मासिक पाळी दरम्यान चांगल्या स्वच्छतेच्या सवयी कोणत्या आहेत आणि त्याचे महत्त्व काय आहे हे मुलींना समजावून सांगणे आणि त्यांच्या मनातील मासिक पाळी विषयीच्या शंकांचे निरसन करणे, हे कार्य याद्वारे केले जात आहे.

मासिक पाळी विषयीच्या गैरसमजुती किंवा मासिक पाळी दरम्यान योग्य स्वच्छतेच्या सवयी न पाळल्यामुळे होणारे आरोग्याचे दुष्परिणाम टाळणे आणि सदरील कालावधीमध्ये मुलीचे शारीरिक, मानसिक स्वास्थ्य चांगले राहावे असा या उपक्रमाचा उद्देश आहे. माहे जुलै महिन्यातील समुपदेशन हे शहरातील विविध ठिकाणी महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमार्फत हा विशेष उपक्रम राबवण्यात आला आणि यामध्ये एकूण ५६३ मुलींचे समुपदेशन करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदरील उपक्रमामध्ये मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्या मार्गदर्शनाखाली मनपाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपक्रम राबवला.

## विद्यार्थ्यांनो, कष्टाला पर्याय नाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१२ जुलै -** जीवनात चांगले घडावे असे वाटत असेल तर चांगले काम करा, चांगले तेच ऐका. विद्यार्थ्यांनी दृढ निश्चय, सातत्य, आत्मविश्वास आणि नात्यातील आत्मीयता जपणारी चार यशसूत्रे अवगत केली की, त्यांचा यशमार्ग सुकर होतो. अनुभवाने, परिस्थितीने माणूस घडतो. तुमच्या आजच्या अडचणी हेच तुमचे बलस्थान आहेत. विद्यार्थ्यांनो, कष्टाला पर्याय नाही, कष्ट करा, असा सल्ला प्रसिध्द प्लास्टिक सर्जन डॉ. विठ्ठल लहाने यांनी दिला.



येथील एम. डी. प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित 'गाथा यशाची' या व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, 'आरसीसी'चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले.

यावेळी डॉ. लहाने म्हणाले, वाट चुकलात तरी जी सावरते ती आई आहे. ती जेव्हा भेटते तेव्हा दिवसभराचा थकवा निघून जातो. त्यासाठी तिला मायेची मिठी मारा, तिच्या कुशीत झोपा, त्यापेक्षा मोठे सुख नाही. आई-वडील हेच तुमचे-माझे दैवत आहेत. ते घरात असण्यापेक्षा मोठा आनंद नाही. आई-वडिलांच्या आवडी-निवडी जपण्यासारखे सुख नाही. कितीही मोठे व्हा, पण नात्यातील आत्मीयता जपा. समाजात चांगली कामे करणारी माणसे आहेत. त्यांना जपले पाहिजे. त्यांना शाबासकी दिली पाहिजे, असा सल्ला त्यांनी दिला.

प्रास्ताविक उदय देशपांडे यांनी तर सूत्रसंचालन अब्दुल गालिब शेख यांनी केले. आभार प्रा. सुधीर तोडकर यांनी मानले. यावेळी मान्यवर, पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खरेदीविक्री संघाच्या चेअरमनपदी बाबुराव पडुळे, बळीराम औटे व्हाईस चेअरमन



पैठण दि १३:- पैठण तालुका शेतकरी खरेदीविक्री संघाच्या चेअरमन आणि उप चेअरमन निवडीची प्रक्रिया आज पार पडली यात खासदार संदीपान भुमरे, आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली चेअरमनपदी बाबुराव पडुळे तर व्हाईस चेअरमन पदी बळीराम औटे यांची पुन्हा बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी नवनियुक्त चेअरमन बाबुराव पडुळे आणि व्हाईस चेअरमन बळीराम औटे यांचा आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यात्रसंगी नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे, मार्केट कमिटीचे उपसभापती राम पाटील एरंडे,शहादेव लोहारे,स्वीय सहाय्यक सतिष अंधारे, संतोष बोठे,नूतन संचाकल गणपत माने,दीपक मोरे, देविदास पठाडे,महेश बोंबले,हरिश्चंद्र तांबे, अमोल गिरगे,सुरेश लिपाने, अनिल हजारे,लक्ष्मी नलावडे, सोपान थोरे,लताबाई तांबे, कालिंदा थोरात,दीपक भडके, बंडू महाराज गाढे, विजय सुट्टे आदींसह शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## आसमंत पुरवणीतील इतिहास पंढरीच्या पांडुरंगाचा लेख आवडला



आपल्या सोलापूर तरूण भारत या पेपरमधील आसमंत पुरवणीतील इतिहास पंढरीच्या पांडुरंगाचा हा सुधीर कोर्टीकरांचा लेख आवडला.आम्ही सारेजणच प्रत्यक्ष पंढरीत आहोत इतकं सुंदर वर्णन लेखात केलेले आहे.पंढरपुरातील पांडुरंगाच्या मंदिरातील भावपूर्ण माहितीपूर्ण वर्णनाची आम्ही प्रत्यक्ष दर्शन घेतं आहोत हा आनंद .. समाधान लाभेले.

मंदिराचा इतिहास, वारीची माहिती, वारकरी संप्रदाय, विविध संत, भक्तांची माहिती आणि पुढे चालू असणाऱ्या त्या त्या संतांच्या परंपरा चालवणारे भक्तगण... सगळे काही इतंभूत सविस्तर वाचताना मन लेखातच गुंतून जाते. आम्हाला पंढरीत येऊन डोळ्यांचे पारणे फिटल्यासारखे वाटले . अप्रतिम लेखाच्या माध्यमातून पांडुरंगाच्या प्रसादाचा लाभ झाला असेही वाटून गेलं.

सुधीर कोर्टीकरांचे खूप खूप अभिनंदन आम्हालां या लेखातून पांडुरंगाचे दर्शन घडवून आणल्याबद्दल.त्याचं प्रमाणे सोलापूर तरूण भारत पेपरचे खूप खूप धन्यवाद...

**सौ. अंजली राजेंद्र कस्तुरे**
**( प्रसिद्ध कवयित्री नी रांगोळी कलावंत) छत्रपती संभाजीनगर**

# आपत्तीला तोंड देण्यासाठी एकात्म आणि जागरुक समाजाची आवश्यकता

पुणे, दि. १२ : निसर्गात बदल हे होतच राहणार त्यामुळे आपत्ती ही अपरिहार्य आहे. त्या अनुभवातून धडा घेऊन मूलगामी उपाय करण्याची गरज आहे. त्यासाठी एकात्म आणि जागरुक समाजाची आवश्यकता आहे. लोभ ही आपत्ती व्यवस्थापन करताना येणारी सर्वात मोठी अडचण असून संतुलित जीवन पद्धती हाच त्यावरील उपाय आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा अंतर्भाव शिक्षणात केला पाहिजे. आपत्तीला तोंड देण्यासाठी केवळ भावना पुरेशी नसते तर कौशल्य देखील आवश्यक असते. त्यादृष्टीने सेवा भारतीने चांगले काम केले आहे, असे प्रतिपादन पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम यांनी आज येथे केले.

राष्ट्रीय सेवा भारती आणि सेवा भारती पश्चिम महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय सेवा साधना - आपदा प्रबंधन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे आयुक्त



शेखर सिंह, मुंबईतील सोमय्या विद्यापीठाचे प्र-कुलगुरु आणि आपत्ती व्यवस्थापन तज्ञ प्रा. डॉ. सतीश मोढ आणि सेवा भारती पश्चिम महाराष्ट्र या संस्थेचे अध्यक्ष विजय काळे उपस्थित होते.

बृहन् महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या पद्मश्री डॉ. सायरस पूनावाल ऑडिटोरियममध्ये हा समारंभ झाला.

या प्रसंगी आपले विचार व्यक्त करताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, आपत्तीला तोंड देण्यासाठी कितीही तयारी केली तरी प्रत्यक्षात त्या व्यवस्थेत कमतरता जाणवतेच. ग्रामीण भागात गावकरी तातडीने मदतीसाठी पुढे येतात, मात्र त्यांनाही प्रशिक्षणाची गरज असल्याचे जाणवते. आपद्ग्रस्त परिसरातून नागरिकांचे स्थलांतर करताना खूप सतर्क रहावे लागते. भूकंपाला तोंड देऊ शकतील अशा इमारती बांधल्या आहेत का? असा प्रश्न काही प्रदेशातील बांधकामे बघितल्यावर पडतो. शहरी भागात पाणी तुंबण्याची मोठी समस्या आहे, त्याला अनेक घटक कारणीभूत असतात. नद्यांची लांबी लक्षात घेता नदी किनाऱ्यांवर नजर ठेवणे शक्य होत नाही. आपत्ती व्यवस्थापनासाठी पिंपरी चिंचवडमध्ये महापालिका सेवा भारतीच्या सहकार्याने काही उपक्रम राबवत आहे.

प्रमुख वक्ते प्रा. डॉ. सतीश मोढ म्हणाले, दुर्घटना घडते त्या वेळी अनपेक्षित परिस्थितीला सामोरे जावे लागते. त्यासाठी शाळेपासून शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. कोणती दुर्घटना कशामुळे घडते हे सांगणे गरजेचे आहे. आपला जीव कसा वाचवायचा याचे ज्ञान नसते, त्यामुळे हानी होते आणि संकट ओढावते. हे दुष्टचक्र तोडणे आवश्यक आहे. नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण नसल्यामुळे परिस्थितीची जाणीव न झाल्याने अनेक ठिकाणी चेंगराचेंगरीच्या घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने अशा घटनांचे राजकारण केले जाते. आपला अमूल्य जीव वाचवणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. मुंबईमध्ये मोकळ्या मैदानांवर असणारे केबलचे जाळे ही आपत्कालीन स्थितीत तिथे हेलिकॉप्टर उतरवण्यातील सर्वात मोठी समस्या आहे. मुंबईतील ६० टक्के लोकसंख्या झोपडपट्ट्यांमध्ये राहते, ही कच्ची घरे भूकंपाला तोंड देण्यास सक्षम नाहीत. सुमारे १६ हजार इमारती पावसाळ्यात धोकादायक ठरतात. त्यामुळे भूकंप किंवा वादळासारख्या आपत्तीत सुमारे एक कोटी नागरिकांचा जीव धोक्यात येऊ शकतो. सरकारने या नागरिकांना मोफत घरे बांधून दिल्यास मानवतेसाठी ते एक वरदान ठरेल. नियम डावलून केलेले बांधकाम म्हणजे आपणच बांधलेली आपली कबर असते, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. सार्वजनिक स्वच्छता, नागरी कर्तव्ये आणि कायद्याचे पालन हे आपत्ती व्यवस्थापनासाठी अतिशय आवश्यक आहे.

हिंदी आणि इंग्रजी भाषेतील या पुस्तकातील लेखकांच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ञ डॉ. राजन गेंगजे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, आपत्ती व्यवस्थापन हा विषय वैदिक काळापालून भारतात अस्तित्वात आहे. भगवान श्रीकृष्णांनी हाताच्या करंगळीवर उचलेल्या गोवर्धन पर्वताखाली आसरा घेतलेले गोकुळवासी हे त्याचे उदाहरण आहे. नेतृत्व, निर्णयक्षमता आणि सामुहिक कृती या आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक बाबी आहेत. इसवी सनाच्या ३ ऱ्या आणि ४ थ्या शतकात चाणक्याने चंद्रगुप्त आणि बिंबिसार या राजांना मार्गदर्शन करताना आपत्तीच्या प्रसंगी मदत न करणाऱ्यांना दंड ठोठावण्याचा उपदेश केला होता. २००१ साली गुजरातमध्ये झालेला भूकंप आणि २००४ साली आलेली त्सुनामी या महाप्रलयंकारी घटनांनंतर केंद्र सरकारने उच्चसत्रिय समिती स्थापन केली. त्यानंतर एनडीआरएफ सारख्या यंत्रणा उभ्या राहिल्या आणि आपत्ती व्यवस्थापनाचे चित्र बदलेल. तोपर्यंत देशाची सैन्यदले आपत्तीत मदतकार्य करत होती, वास्तविक त्यासाठी सैन्य तयार केले जात नाही. समाजाला प्रशिक्षण देणे महत्वाचे काम असून सेवा भारती ते करत आहे. समाजाला प्रोत्साहित करण्यासाठी प्रभावशाली व्यक्तींची मदत सेवा भारतीने घ्यावी.

सेवा भारती पश्चिम महाराष्ट्रचे सचिव प्रदीप सबनीस यांच्या हस्ते डॉ. गेंगजे यांचा प्रातिनिधिक स्वरुपात सत्कार करण्यात आला.

समारंभाच्या प्रास्ताविकात विजय काळे यांनी सेवा भारती पश्चिम महाराष्ट्रच्या कार्याचा आढावा घेताना शिक्षण, आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापन या विषयांना प्राधान्य देत लहान शाळांमध्ये फिरत्या प्रयोगशाळा, लहान गावांमध्ये फिरते दवाखाने, शहरातील वस्त्यांमध्ये संस्कारवर्ग, अभ्यासिका आदी उपक्रम सुरू असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवा भारती पश्चिम महाराष्ट्रचे प्रांत कोषाध्यक्ष सुधीर जवळेकर यांनी केले.

# पर्यावरणवादी प्लास्टिकमुक्त शाळेसाठी कापडी पिशव्यांचे वाटप

छत्रपती सभाजीनगर -

छत्रपती सभाजीनगर राजाबजार परिसरातील पि.यू .जैन माध्यमिक विद्यालयात व प्राथमिक विभागात लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजल्स च्या वतीने आषाढी एकादशी च्या निमित्ताने पर्यावरण संरक्षण या विषयावर चित्रकला स्पर्धा इयत्ता, दहावीतील गुणवंत विद्यार्थी सन्मान, दिशा राजू चिपोले, ज्योती शिंदे, धनश्री महाले, श्रुतिका



महतोले, अनुष्का कंदुर यांच्या सह अन्य विद्यार्थिनींना स्मृतिचिन्ह भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले व चित्रकला स्पर्धेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यात्रसंगी डी यू जैन बालक मंदिरच्या बाल गोपालांनी अतिशय सुंदर अशा महाराष्ट्रीयन पारंपारिक वेशभूषेत तुळशी वृंदावन घेऊन, टाळ मृदुंग वाजवत, नाचत गात पालखी सोहळा आयोजित केला होता. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुन्दर संगीत वाद्य वृंदासह गीत सादर करून सर्वांची मने जिंकली. यात्रसंगी जैन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष महावीर सेठी, मुख्याध्यापक विजय पाटोदी, कविता ठोळे , सुवर्णा शहा यांची उपस्थिती होती. लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजलच्या वतीने अध्यक्षा नीतू शिंदे, सचिव रीता जयेश पुरवार, कोषाध्यक्ष राखी पांडे, रुचिका जयस्वाल भावना गौरक्षक, वैशाली बंब आदींची उपस्थिती होती. यात्रसंगी लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद एंजिल्स

सर्व विद्यार्थ्यांना फळ व खाऊ वाटप करून आषाढीचा आनंद द्विगुणित केला. सोबतच पर्यावरणवादी प्लास्टिक मुक्त शाळेच्या साठी कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. २५५/२०२५ पुढील तारीख १३/८/२०२५

अर्जदार :- १) रविंद्र पि. गिरधर पवार, वय- ३४ वर्षे, धंदा- शेती, रा. उंबरखेडा तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद २) विकास पि. गिरधर पवार, वय- ३६ वर्षे, धंदा- शेती, रा. उंबरखेडा तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद ह.मु. इंगळे नगर, जेल रोड नाशिक ता.जि. नाशिक ३) काळु पि. गिरधर पवार, वय- ४४ वर्षे, धंदा- शेती, रा. उंबरखेडा तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद ४) सगुनाबाई भ्र. गिरधर पवार, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. उंबरखेडा तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : Bombay Regulation Act 1827 कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ पी.एस. जाधव यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील ठिकाणचे रहीवाशी असुन अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. ४ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांचे वडील व अर्जदार क्र. ४ यांचे पती नामे गिरधर हरलाल पवार हे होते ते दिनांक ०६/०४/२०२५ रोजी उपचारा दरम्यान चाळीसगाव येथील कृष्णा क्रिटीकेअर हॉस्पीटल येथे मयत झाले आहे, व त्यांचा अंत्यविधी मौजे उंबरखेडा तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे, मयत गिरधर हरलाल पवार यांचे अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे.

अर्जदार क्र. १ ते ४ यांना मयत गिरधर हरलाल पवार यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची मागणी अर्जदार क्र. १ ते ४ हे करीत आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,
दिनांक ०२/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र.३५०/२०२५ पु.ता. १२/०८/२५

अर्जदार : १- अजिनाथ दौलतराव ऊर्फ दौलत मनगटे, वय- ४७ वर्ष, धंदा- नौकरी. रा. शेलगाव, पो. दहीगाव, ता. कन्नड, जि. ओबाद २- सुभाष दौलत मनगटे, वय- ४४ वर्षे, धंदा- शेती, रा. शेलगाव, पो, दहीगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद २- अशोक दौलत मनगटे, वय- ४३ वर्ष, धंदा- शेती, रा. शेलगाव, पो. दहोगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३- किशोर दौलत मनगटे, वय- ३२ वर्षे, धंदा- नौकरी, रा. शेलगाव, पो. दहीगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ५- सुमित्राबाई भ्र. दौलत मनगटे, वय ७९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. शेलगाव, पो. दहीगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गर अर्जदार : निरंक

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ-भाऊ असुन अर्जदार क्र. ५ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ५ यांचे पती नामे दौलत संपत मनगटे हे होते ते दिनांक ०८/०९/२०२४ रोजी मौजे शेलगाव ता. कन्नड येथे मयत झालेले असुन त्यांचा अंत्यविधी त्यांच्या मूळ गावी मौजे शेलगाव येथे झालेला आहे, अर्जदार यांना मयत दौलत संपत मनगटे यांचे वारस प्रमाणपत्र हे शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच, विविध शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे दिनांक ०४/०७/२०२५ रोजी तोंडी सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक ०८/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. आर. एस. तापडीया, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: २१७/२०२५ पु.ता. २९/०८/२०२५

अर्जदार : सुनंदा कडुबा घुसळे व ईतर

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी साहेब औरंगाबाद

अर्ज : Bombay Regulation Act 1827 मधील कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ पी. एस. जाधव यांच्या मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे की, कचरु धोंडीबा घुसळे हे दिनांक १२/०२/१९९६ रोजी मौजे जैतापुर ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांच्या पत्नी नामे मंडाबाई कचरु घुसळे हया दिनांक २२/०२/२०१७ रोजी घर क्र. बी. ६ गल्ली नं. १ रमानगर क्रांती चौक औरंगाबाद येथे मयत झाल्या आहे. दोन्ही मयत हे मुळ जैतापुर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथील रहीवाशी होते त्यांना कडुबा कचरु घुसळे व बाळु कचरु घुसळे असे दोन आपत्य होते, त्यापैकी कडुबा कचरु घुसळे यांचा दिनांक १६/०५/२०१० रोजी शासकीय वैदयकीय महाविद्यालय औरंगाबाद येथे मृत्यु झालेला आहे, त्यांना अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे. तसेच बाळु कचरु घुसळे हे देखील दिनांक २७/०४/१९८९ रोजी मौजे जैतापुर ता. कन्नड येथे मयत झाले आहे. त्यांचे अर्जदार क्र. ६ व ७ हे वारस आहे.

अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी, महुल दफ्तरी वारसांची नोंद करण्यासाठी, तसेच तलाठी, ग्राम पंचायत कार्यालयात वारसांची नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक ३०/०६/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. २११/२०२५ पुढील तारीख २५-०७-२०२५

अर्जदार : १) रंगनाथ महादू चव्हाण, वय ७५ वर्ष धंदा सेवा निवृत्त, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २) संतोष रंगनाथ चव्हाण, वय-४४ वर्षे, धंदा- मजुरी, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद, ३) सुरेखा पुंजाबा बावस्कर, वय- ५१ वर्षे, धंदा- घरकाम, रा. संग्राम नगर सातारा परीसर, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद, ४) कल्पना कैलास कोलते, वय- ४७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. जटवाडा रोड, हर्सल औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद, ५) उषा रंगनाथ चव्हाण, वय- ३७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद,

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ मोहमंद इकबाल यांचे मार्फत मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील आहे, तसेच अर्जदार क्र. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहीन आहे. अर्जदार क्र. १ यांच्या पत्नी तसेच अर्जदार क्र. २ ते ५ यांच्या आई नामे रुखमनबाई रंगनाथ चव्हाण या होत्या त्या दिनांक २२/०९/२०१७ रोजी राहत्या घरी मौजे शिवनगर, कन्नड ता. कन्नड येथे मयत झालेल्या आहे, त्यांचे अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे, सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी, तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ५ हे मयताचे कायदेशीर मयताचे वारस आहे

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.
दिनांक २६/०६/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर.एस. तापडीया, दिवानी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्रमांकः ३१४/२०२२५ पु. तारीख : १३/०८/२०२५

अर्जदारः पोपट शेकु राजपुत, वय-७८ वर्षे, धंदा- काही नाही, रा. गव्हाली तांडा पो. औराळा ता. कन्नड, जि. छ. संभाजी नगर, (औरंगाबाद)

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर जि. छ. संभाजीनगर

अर्ज : वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे चुलते कचरु शंकर राजपुत हे दिनांक २४.०३.१९९३ रोजी मौजे गव्हाली तांडा, ता. कन्नड येथे मयत झाले असुन त्यांचा अंत्यविधी मौजे गव्हाली तांडा येथे करण्यात आला आहे. अर्जा सोबत ग्राम पंचायत गव्हाली तांडा यांचे मयताचे प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयतास वर्ग एक चे वारस नसल्याने व ते अविवाहीत मयत झाल्याने मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला घेण्यासाठी अर्जदारास वारसप्रमाण पत्राची आवश्यकता आहे. मयतास अर्जदारा व्यतिरीक्त ईतर कोणीही वारस नाही त्यामुळे अर्जदार मयताच्या वारसप्रमाण पत्राची न्यायालयात मागणी करीत आहे.

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक ०९/०७/२०२५ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

दिनांक ०९/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र.३/२/२०२४

अर्जदार : १- रामकृष्ण शंकर वाघचौरे, वय- ३८ वर्षे, धंदा- शेती, रा. धनगरवाडी-औराळा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) २-परिगाबाई भ्र. शंकर वाघचौरे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. धनगरवाडी-औराळा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ३- लताबाई भ्र. पोपट काळे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. चिंचखेडा बु. ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ४- वंदना भ्र. तात्याराव पवार, वय ५३ वर्षे, धंदा घरकाम, रा. चापानेर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ५- ज्योती भ्र. पंढरीनाथ निकम, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. गव्हाली, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ६- कल्पना भ्र. संजय भोजणे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. विटा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ७- कांताबाई भ्र. विजय भोंगळे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. आंबा ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ८-सरीता भ्र. गंगाधर ठुबे, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. पोखरी, ता. वैजापूर, जिल्हा छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

- विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी छ. संभाजीनगर (औरंगाबाद),

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ पी. एस. जाधव यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक २ यांचे पती व १,३ ते ८ यांचे वडील नामे शंकर भिका वाघचौरे हे दिनांक १७/११/२०२३ रोजी मौजे धनगरवाडी ता. कन्नड, जि.छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहे सोबत ग्रुप ग्राम पंचायत धनगरवाडी/औराळा यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे.

मयताच्या नावे भविष्यात शासकीय, निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी, तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक १०/१०/२०२४ रोजी घडले आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारांशिवाय मयतास कोणीही ईतर वारस नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक १२/११/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.आर.एस. तापडीया मॅडम) साहेब क.स्तर, यांचे कोर्टात**

दि.किरकोळ अर्ज क. ३५६/२०२५

अर्जदार - श्री. संजय पि.छगन केवट वय-५८ धंदा- शेती रा. हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार :- श्री. छगन पि.गुडजीराम केवट वय-७६ धंदा-शेती रा-हतनुर ता. कन्नड जि. औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांची जन्मदाती आई व गैरअर्जदार यांची पत्नी मयत नामे रुख्मनबाई भ्र. लालमन केवट यांचा मृत्यु दि. १८/०१/२०१३ रोजी मौजे मकणपुर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून मयतास केवळ अर्जदार व गैरअर्जदार हेच मयताचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदार व गैरअर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयतास खालीलप्रमाणे कायदेशिर वारस आहे. मयत रुख्मनबाई भ्र.लालमन केवट यांचे नांवे असलेल्या जंगम व स्थावर मिळकतीबाबत वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार व गैरअर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मयत रूख्मनबाई भ्र.लालमन केवट यांचे नांवे असलेल्या जंगम व स्थावर मिळकतीबाबत तसेच शासकीय, निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी तसेच वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार व गैरअर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ११/०७/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३४३/२०२५ पुढील तारीख २५/८/२०२५

अर्जदार : १. प्रकाश पि. शंकरराव खैरनार वय-७५वर्षे, धंदा निवृत्त, रा. आखाडे रोड, सब स्टेशन जवळ, जैताने धुळे ता.जि. धुळे २. लिलाबाई भ्र. प्रकाश खैरनार वय ६५ वर्षे, धंदा-घरकाम, रा. आखाडे रोड, सबस्टेशन जवळ, जैताने धुळे ता. जि. धुळे ३. दिपीका भ्र. श्रीकांत खैरनार वय- ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. चंद्रलोकनगरी कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद ४- नयन पि. श्रीकांत खैरनार वय २२ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. चंद्रलोकनगरी कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. श्रुतीका पि. श्रीकांत खैरनार वय- २४ वर्षे, धंदा- नौकरी, रा. चंद्रलोकनगरी कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार १-निरंक

अर्ज : मुंबई रेग्युलेशन ॲक्ट अन्वये, वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ एम. एम. भारुका यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ चा मुलगा व अर्जदार क्र. ३ चे पती व अर्जदार क्र. ४ व ५ यांचे वडील नामे श्रीकांत प्रकाश खैरनार यांचा दिनांक १९/११/२०२३ रोजी साक्री जि. धुळे येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्चात अर्जदार क्र. १ ते ५ हेच केवळ वारस असुन अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कोणतेही वारस नाही. अर्जदार क्र. ३ यांचे पती मयत नामे श्रीकांत प्रकाश खैरनार मृत्युपुर्वी कन्नड ता. कन्नड येथील कायमचे रहीवाशी असुन नौकरी करुन अर्जदार क्र. १ ते ५ यांचा उदरनिर्वाह करीत होते. अर्जदार वरील प्रमाणे मयत श्रीकांत प्रकाश खैरनार यांच्या मृत्यु पश्चात वारसा हक्काने मिळणारे सर्व हक्क व अधिकार तसेच शासकिय व निमशासकीय फायदे व अभिलेखात नोंदी घेण्या करीता वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे. सदरील शासकीय कामकाजात सक्षम न्यायालयाच्या वारसा प्रमाणपत्रा शिवाय अर्जदाराचे हक्क व अधिकार बजावण्या करीता अडचण निर्माण झालेली असल्यामुळे प्रस्तुतच्या अर्जास दिनांक ३०/०६/२०२५ रोजी कारण घडले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन,
दिनांक ०९/०७/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,क. स्तर कन्नड

## रोखठोक

दिनेश गुणे

# व्यवस्थापन कौशल्याचा वस्तुपाठ!

महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन आणि उपराजधानी नागपुरात होणारे हिवाळी अधिवेशन यांना काही वेगळे राजकीय रंगदेखील असतात, असा इतिहास आहे. या अधिवेशनकाळात राज्याच्या राजकारणात अनेक ऐतिहासिक घडामोडी घडल्या आहेत. पावसाळी अधिवेशनात तसे झाल्याचे फारसे दिसत नाही. त्यामुळे, पावसाळी अधिवेशन हे प्रशासकीयदृष्ट्या महत्त्वाचे ठरते. या अधिवेशन काळात राज्याच्या प्रशासकीय वाटचालीस दिशा देण्याचे काम होते, असा सर्वसाधारण इतिहास आहे. त्याचे कारणही आहे. राजकीय हेवेदावे, राजकारणातील कात्रजच्या घाटाच्या खेळी, कुरघोड्या आणि धोबीपछाड वगैरे सारे काही पावसाळी अधिवेशनाच्या काळात टाळून राज्याच्या हिताच्या प्रश्नांवर सामंजस्याने सरकारसोबत सहभागाची व समन्वयाची भूमिका घेण्याची मानसिकता विरोधकांमध्ये या काळात रुजलेली असते, त्यामुळे विरोधासाठी विरोध किंवा राजकारणाचा आखाडा करण्याकरिता सभागृहांचा वापर होऊ नये ही समंजस बाब या अधिवेशनात सहसा सातत्याने दिसत आली आहे. याबाबत कोणाचेही दुमत असणार नाहीच, उलट, असेच चित्र प्रत्येक अधिवेशनाच्या काळातही दिसावे याबाबत सार्वत्रिक सहमतीच दिसेल. राजधानी मुंबईच्या विधान भवनात सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनातदेखील हेच चित्र अधोरेखित झालेले पाहावयास मिळते. सामंजस्य आणि समंजस सहभागाचा जो चांगला पायंडा या अधिवेशनात महाराष्ट्रास पाहावयास मिळाला, त्याचे निर्विवाद श्रेय सत्ताधारी महायुतीच्या कामकाज व्यवस्थापनास द्यावे लागेलच, पण विरोधकदेखील या श्रेयाचे मानकरी आहेत यात शंका नाही. म्हणून, राज्यातील जनतेस अपेक्षित असलेल्या राज्याच्या व जनहिताच्या महत्त्वाच्या बाबींवर दिसणारी सहमती हे या अधिवेशनाचे वेगळेपण आहे असे म्हणावे लागेल. त्यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांचेही अभिनंदन करावयास हवे.

विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस मुख्यमंत्र्यांसमवेत होणाऱ्या चहापानाच्या औपचारिक कार्यक्रमास विरोधकांनाही निमंत्रण असते, तसे या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येसही होते. ३० जूनपासून सुरू होणाऱ्या अधिवेशनाच्या आदल्या दिवशी महाराष्ट्रात त्रिभाषा सूत्रानुसार हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या एका शासकीय निर्णयाच्या विरोधात विरोधकांनी रण माजविले होते. विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील मशालधारी शिवसेनेचा गट आणि राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या आक्रमक आंदोलनाच्या पवित्र्यामुळे राज्यात काहीसे सामाजिक तणावाचे वातावरण पसरण्याची चिन्हेदेखील दिसू लागली होती. याच निमित्ताने, दोघे ठाकरे बंधू १९ वर्षांनंतर प्रथमच एकत्र येणार असल्याने, चित्रवाणी क्षेत्रातील वृत्तमाध्यमांत कमालीचा उत्साह संचारला होता. राज्याच्या राजकारणातील एक ऐतिहासिक घटना घडणार असून उभ्या महाराष्ट्राचे राजकीय भविष्यच या संभाव्य ऐक्याने बदलून जाणार आहे, असे चित्र उभे करण्यात वृत्तवाहिन्यांची अक्षरशः चढाओढ लागल्याने, अधिवेशनाची हवादेखील विरळ होऊन केवळ ठाकरे बंधूंच्या संभाव्य मनोमिलनाकडे राज्याचे लक्ष लागले आहे, असे भासविण्याचा जोरदार प्रयत्न स्पष्ट झाला होता. याच वेळी, सत्ताधारी महायुतीने कमालीचा समंजसपणा दाखविला आणि विरोधकांनी वादग्रस्त ठरविलेला तिसऱ्या भाषेची सक्ती करणारा निर्णयच रद्द केला. अधिवेशन सुरळीत पार पडावे व भाषेच्या मुद्यावरून राज्यात सामाजिक दुफळी निर्माण होऊन अशांतता पसरू नये, यासाठी तसे करणे आवश्यकच होते. पण विरोधकांनी, विशेषतः उद्धव ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी सरकारचा हा निर्णय म्हणजे आपला विजय आहे, असे चित्र रंगवून विजयी मेळाव्याचे आयोजन करत ऐक्याच्या चर्चेवर सकारात्मक शिक्कामोर्तब करण्यासाठी मेळाव्याचा यशस्वी वापर केला. हिंदी सक्तीच्या निर्णयाशी त्या मेळाव्याचे काहीच देणेघेणे राहणार नाही याची तजवीजही झाली होती. साहजिकच, हिंदी सक्तीच्या राज्य सरकारने जारी केलेल्या व नंतर मागे घेतलेल्या निर्णयाच्या ढालीआडून ऐक्याच्या कथित ऐतिहासिक हालचालींना वेग देण्याच्या बातम्यांनीच माध्यमांचेही रकाने रंगले आणि हिंदी सक्तीच्या वादामुळे अधिवेशनावर दाटलेले संभाव्य सावट आपोआप विरून गेले. एका अर्थाने, ज्या निर्णयाच्या माघारीबद्दल विजय मेळावे घेण्याचा निर्णय उबाठा व मनसेने घेतला होता, तो अप्रत्यक्षपणे सरकारचाच विजय ठरला आणि अधिवेशनावरील संभाव्य वादापासून मुक्त झाल्याचा सुस्कारा सरकारने सोडला. गेल्या दोन आठवड्यांतील अधिवेशनकाळातील कामकाज पाहिले, तर तेव्हा सरकारने सोडलेला तो सुस्कारा साहजिक होता असेच म्हणावे लागेल. ऐक्याच्या चर्चेलाही आता कालांतराने विराम मिळाला आहे. त्यामुळे, अर्थसंकल्पीय किंवा हिवाळी अधिवेशनाच्या काळात घडणाऱ्या राजकीय घडामोडींपासून यंदाचे पावसाळी अधिवेशन मात्र अगोदरच मुक्त झाले होते. उबाठा गट आणि मनसे वगळता या वादाची फारशी दखल न घेतलेल्या अन्य विरोधकांनाही या समंजसपणाचे श्रेय द्यावे लागेल. सर्वपक्षीय विजयी मेळावा असे वर्णन करून मराठीप्रेमींना निमंत्रित करणाऱ्या राज व उद्धव ठाकरे यांनी या मेळाव्यावर आपलीच छाप राहील याचा पुरेपूर प्रयत्न केला होता. मेळाव्याच्या अखेरीस अन्य राजकीय पक्षांच्या नेत्यांना मंचावर निमंत्रित करण्यापुरता सहभाग सोडला, तर या मेळाव्यात ठाकरे बंधूंच्या ऐक्याच्या चर्चेचे काँक्रीटीकरण करण्याचाच मुख्य हेतू असल्याचे लपून राहिलेच नव्हते. अशाच वातावरणात चहापान कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचे विरोधकांनी जाहीर केले, तेव्हा अधिवेशन वादळी ठरणार अशी पठडीबाज भाकितेही वर्तविली गेली. मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस चहापानाचा कार्यक्रम आयोजित करून त्यास विरोधकांना निमंत्रित करावे ही एक सकारात्मक प्रथा आहे. यामुळे अधिवेशनातील कामकाज खेळीमेळीच्या व सहकार्याच्या वातावरणात पार पडावे हा या प्रथेमागचा हेतू असला, तरी या चहापान बैठकीवर विरोधकांनी बहिष्कार घालणे ही प्रथादेखील गेल्या काही वर्षांपासून रूढ झाली आहे. त्यामुळे, या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस या प्रथेचे पालन करून चहापानावर विरोधकांचा बहिष्कार सत्ताधाऱ्यांस किंवा जनतेसही अनपेक्षित



नव्हताच. राज्यातील कायदा सुव्यवस्था स्थिती, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांची अवस्था या मुद्यांवर बोट ठेवत विरोधकांनी बहिष्काराचा निर्णय जाहीर केला, तेव्हा खरे तर विरोधकांचे मुख्य लक्ष ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यावरच खिळलेले होते. अधिवेशनात विरोधक सत्ताधाऱ्यांना कोणत्या मुद्यांवर घेरणार याचे काही नेहमीचे आडाखेही एव्हाना मांडून झाले होते, त्यात हिंदी भाषासक्तीचा मुद्दाही साहजिकच होता. पण अधिवेशनाच्या आदल्याच दिवशी सरकारने संबंधित शासन निर्णय रद्द करून या निर्णयाबाबत नव्याने विचार करण्याकरिता डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली नवी समिती नेमून विरोधाची हवा काढून टाकली होती. दुसरीकडे, उबाठा-मनसे ऐक्याची जोरदार हवा वाहू लागलेली असताना, काँग्रेसच्या गोटात मात्र, ठाकरे गटासोबत महाविकास आघाडीत राहावे किंवा नाही याबाबतची चलबिचल सुरू होती. बहुधा अधिवेशनाच्या आदल्याच दिवशी, काँग्रेस हायकमांडने दिल्लीत बोलाविलेल्या तातडीच्या बैठकीत राज्यातील काही काँग्रेस नेत्यांना बोलावणे धाडले गेले आणि महाविकास आघाडी आगामी निवडणुकांत दिसणार किंवा नाही या चर्चेला उधाण आले.

या घडामोडी वरवर वेगवेगळ्या दिसत असल्या, तरी त्यामध्ये एक सुसूत्रता जाणवते. अधिवेशन सुरळीत पार पडावे यासाठी सत्ताधाऱ्यांकडून काही नेमकी पावले उचलली जात असतात. संसदीय भाषेत त्याला फ्लोअर मॅनेजमेंट किंवा मंच व्यवस्थापन म्हटले जाते. सभागृहातील कामकाजात विरोधकांना खुबीने सहभागी करून घेण्याची व अधिवेशनाच्या कामकाजाची दिशा भरकटू नये याची काळजी घेण्याचे तंत्र म्हणून फ्लोअर मॅनेजमेंटकडे पाहिले जाते. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस घडलेल्या या घडामोडी पाहता, सत्ताधाऱ्यांच्या फ्लोअर मॅनेजमेंट कौशल्याशी जुळणारे काही अदृश्य धागेदोरे सहज उघड होऊ शकतात. एकीकडे राज-उद्धव यांच्या ऐक्याच्या चर्चांना वेग आलेला असतानाच, सत्ताधाऱ्यांच्या विरोधातील महाविकास आघाडीचे ऐक्य मात्र खिळखिळे होण्याचे संकेत देणाऱ्या या घडामोडी म्हणजे केवळ योगायोग मानावा किंवा कसे, हे नंतरच्या दोन आठवड्यांतील कामकाजातील विरोधकांच्या सहभागातून दिसू लागले होते. हिंदी भाषासक्तीच्या निर्णयाचे खापर तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारच्या माथ्यावर फोडण्याची भाजपची खेळी, महाविकास आघाडीतील काँग्रेसचा वेगळा सूर, शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी एकनाथ शिंदे यांची फेरनिवड, भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांच्या निवडीमुळे भाजपमध्ये संचारलेला उत्साह आणि अधिवेशनाआधीच संभाव्य वादांची मुळे निपटून टाकण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लाभलेले यश हे सारे अधिवेशनातील समंजस सहभागाशी जोडले गेलेले असेच काही धागे आहेत. हिंदी भाषासक्तीच्या सरकारच्या निर्णयामुळे मराठी माणसाचे ऐक्य होत असल्याचा विरोधकांचा समज होता. त्या निमित्ताने साजरा केला जाणारा विजयोत्सव हा मराठी माणसाच्या ऐक्याचा विजयोत्सव आहे, अशी विरोधकांची भावना होती. काही विरोधी नेत्यांनी ती बोलूनही दाखविली होती. प्रत्यक्षात मात्र, तो मेळावा मराठी माणसाच्या ऐक्याचा विजयाचा नसून ठाकरे बंधूंच्या संभाव्य ऐक्याचा विजयोत्सव असल्याचे उघड झाल्यावर या विरोधकांचाही विरस झाला होता.

विधिमंडळाच्या शुक्रवारी, ११ जुलै रोजी संपलेला कामकाजाचा दुसरा आठवडा अनेक सकारात्मक निर्णय आणि अभिमानास्पद घडामोडींमुळे ऐतिहासिक ठरला आहे. डाव्या कट्टर विचारसरणीच्या संघटनांच्या घटनाविरोधी आणि विघातक कारवायांना आळा घालून या संघटनांचा बीमोड करण्यासाठी राज्य सरकारने तयार केलेल्या जनसुरक्षा कायद्याच्या विशेष विधेयकास बहुमताने मिळालेली संमती हा सरकारच्या व्यवस्थापनाचा आदर्श वस्तुपाठ ठरला आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा सहभाग असलेल्या समितीने केलेल्या सूचनांचा अंतर्भाव असलेले हे विधेयक मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत मांडले. या समितीच्या सर्व सदस्यांनी सहमतीने हा मसुदा संमत केला असून कोणाही सदस्याने असहमती नोंदविलेली नाही, हे या विधेयकाचे वैशिष्ट्य ठरले आहे. देशातील चार नक्षलग्रस्त राज्यांत असा कायदा अस्तित्वात आहे, पण सर्वाधिक नक्षली कारवायांनी त्रस्त असलेल्या महाराष्ट्रात मात्र असा कायदा अस्तित्वात नव्हता. हा कायदा संमत झाल्यामुळे कोणाही व्यक्तीच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर कोणतीही गदा येणार नाही, नागरिकांमध्ये सुरक्षिततेचे वातावरण निर्माण केले जाईल व घटनाविरोधी व देशविरोधी कारवाया करणाऱ्या कट्टर डाव्या माओवादी, नक्षलींच्या मुसक्या आवळणे शक्य होईल. राज्यातील नक्षलवादी संघटनांना आता अखेरची घरघर लागलेली आहे. चार जिल्ह्यांत असुरक्षिततेचे आणि दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या चळवळीचे अस्तित्व आता जेमतेम दोन तालुक्यांपुरते संकुचित झाले असले, तरी पॅसिव्ह सेलमधून म्हणजे अप्रत्यक्षरीत्या चळवळ पोसणाऱ्या व नव्याने लोकशाहीविरोधात सशस्त्र उठाव करण्यासाठी सक्रिय होणाऱ्या शहरी नक्षलवादाची समस्या गेल्या दोन दशकांत फोफावली आहे. जनसंघटनाच्या बुरख्याआडून शहरी नक्षली दहशतवादी तयार करत आहेत आणि भारताची संवैधानिक व्यवस्था उलथवून चीनमधील साम्यवादी व्यवस्था देशात आणण्याचे या चळवळीचे कारस्थान आहे. हे कारस्थान मोडीत काढण्यासाठी या कायद्याची महाराष्ट्रात गरज असून बंदी घालण्यात आलेल्या संघटनेच्या विरोधातच या कायद्याची अंमलबजावणी होईल, असे मुख्यमंत्र्यांनी निःसंदिग्धपणे स्पष्ट केले आहे. विधानसभेतील चर्चेस उत्तर देताना चर्चेतील प्रत्येक सहभागी सदस्याच्या सर्व शंकांचे निरसन हा मुख्यमंत्र्यांच्या व्यवस्थापन कौशल्याचाच एक आदर्श नमुना ठरावा. काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीची सत्ता केंद्रात असताना तत्कालीन गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीच शहरी नक्षलवाद्यांच्या कारवायांची माहिती लोकसभेत दिली होती. अशा कारवायांशी संबंधित असलेल्या सर्वाधिक संघटना महाराष्ट्रात असल्याने या कायद्याची गरज असल्याबद्दल विधिमंडळातील सर्व सदस्यांची सहमती घडविण्यात सरकार यशस्वी ठरले आहे. विधेयकाच्या मसुद्यास सहमती देणाऱ्या, सभागृहात विधेयक मंजूर करणाऱ्या विरोधकांपैकी काही जण आता सभागृहाबाहेर विरोधाचा सूर लावत असले, तरी ती त्यांची राजकीय अपरिहार्यता असावी हे स्पष्ट आहे. काँग्रेसने या विधेयकास सभागृहात पाठिंबा दिल्यानंतर पक्षाचे दिल्लीतील श्रेष्ठी नाराज झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे आता ही नाराजी दूर करण्यासाठी काँग्रेसने विरोधाचा सूर लावला असला, तरी विधिमंडळात या विधेयकास पाठिंबा देऊन राज्याच्या हिताच्या भूमिकेबाबत समंजसपणा दाखविला, याची नोंद निश्चितच घ्यावी लागेल. राज्यघटनेने सर्वांस स्वातंत्र्य बहाल केले असले, तरी कोणतेही स्वातंत्र्य अमर्याद नसते या घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मताचा पुनरुच्चार मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात विरोधी बाकांवरील एका सदस्याच्या आक्षेपास उत्तर देताना केला. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येणार असा कांगावा करत या विधेयकाच्या विरोधात सूर उमटत असले, तरी स्वातंत्र्याच्या अमर्याद अधिकारांची मर्यादाही मुख्यमंत्र्यांनी या चर्चेतून अधोरेखित केली आहे. त्यामुळेच, विशेष जनसुरक्षा कायदा हा महाराष्ट्राच्या जनसुरक्षेच्या उपाययोजनांतील ऐतिहासिक टप्पा ठरला आहेच, पण या अधिवेशनात सहमतीने तो संमत झाल्याने अधिवेशनातील सर्वपक्षीय समंजसपणाही अधोरेखित झाला आहे.

याच अधिवेशनात आणखी एक अभिमानास्पद नोंद झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमी व गौरवशाली इतिहासाचा वारसा आपल्या अंगाखांद्यावर मिरविणाऱ्या १२ किल्ल्यांचा जागतिक ऐतिहासिक वारसा वास्तूंच्या मानांकित यादीत समावेश झाल्याने, महाराष्ट्राच्या इतिहासाची पाने आता जागतिक स्तरावर उघडली जाणार आहेत. सकारात्मक घडामोडींचे पर्व म्हणून या अधिवेशनाची आगळी नोंद भविष्याला घ्यावीच लागेल. राज्यात भक्तिभावाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवास राज्य महोत्सव म्हणून गौरवान्वित करण्याचा निर्णयदेखील मराठी मनास सुखावणारा आहे. आणि विशेष म्हणजे, अनधिकृत भोंगे बंद करण्याचे धाडसही सत्ताधारी महायुतीने दाखविले आहे. आता ठरावीक वेळी अकारण वाजणारे भोंगे शांत होतील आणि राज्यात शांतता नांदेल, अशी आशा करावयास हरकत नाही.

dineshgune@gmail.com

## प्रासंगिक

प्रवीण दीक्षित

# विशेष जनसुरक्षा विधेयक-२०२५

दि. १० जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र विधानसभेने बहुमताने व दि. ११ जुलै २०२५ रोजी विधान परिषदेने बहुमताने महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकास मान्यता दिल्याने राज्यपालांच्या मंजुरीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होण्याचा मार्ग खुला झाला आहे. सदर विधेयकाची आवश्यकता स्पष्ट करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, देशातील काही राज्ये नक्षलग्रस्त किंवा माओवादी यांच्या कडव्या डाव्या विचारसरणीचे बळी ठरले होते. सुरवातीला बंदुका हातात घेऊन भारतीय संविधानाने उभी केलेली व्यवस्था आम्हाला मान्य नाही व आम्हाला साम्यवादी व्यवस्था उभी करायची आहे या विचारातून या संघटना तयार झाल्या होत्या. भारत सरकारने नक्षलवाद ३१ मार्च २०२६ पूर्वी संपवायचा निश्चय करून कठोर कारवाई केल्यानंतर माओवाद्यांनी वेगळे तंत्र वापरायला सुरुवात केली होती. जेव्हा सक्रिय नक्षलवादी मिळत नाहीत तेव्हा, निष्क्रिय नक्षलवादी तयार करायचे यातून मोठ्या प्रमाणात जनसंघटना तयार करायच्या. त्यांची नावे वाचल्यावर या लोकशाही वाचविण्यासाठी आहेत असे वाटते, पण त्यांची कारवाई पाहिल्यानंतर ते लोकशाही मानत नाहीत आणि त्या संघटना भारताचे संविधानही मानत नाहीत हे अधोरेखित होते, हे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. भारतीय संविधान व्यवस्था उलटवून लेलिन, मार्क्स, माओ यांनी चीनमध्ये उभी केलेली व्यवस्था भारतात उभी करायची हा या संघटनांचा विचार आहे.

यापूर्वी अशाप्रकारचा कायदा छत्तीसगड, तेलंगणा, आंध्रप्रदेश, ओडिशा, झारखंड या राज्यांनी केला आहे. असा कायदा केला पाहिजे असे केंद्र सरकारने सगळ्या राज्यांना सांगितले आहे. महाराष्ट्रात मात्र अशा प्रकरणांमध्ये यूएपीए लावण्यात आला होता. पण जोपर्यंत सक्रिय दहशतीची कारवाई होत नाही तोपर्यंत यूएपीए लावता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला. त्यामुळे केंद्र सरकारने सर्व राज्यांना चार राज्यांप्रमाणे कायदा तयार करण्यास सांगितले. यूएपीए सरकारने लोकसभेमध्ये दिलेल्या माहितीप्रमाणे महाराष्ट्रात पुढील संघटना या घटनाविरोधी कारवायांमधे सक्रिय असल्याचे आढळते. त्या अशा : दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटना, क्रांतिकारी आदिवासी महिला संघटना, रेव्होल्यूशनरी डेमोक्रेटिक फ्रंट, विरोधी सांस्कृतिक चळवळ, इंडियन असोसिएशन ऑफ पीपल्स लॉयर, कमिटी अगेन्स्ट व्हॉयलन्स अगेन्स्ट विमेन्स आणि कबीर कला मंच.

या विधेयकाचा कोणताही दुरुपयोग होणार नाही याची ग्वाही देत मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ''हा कायदा महाराष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी, देशाच्या सुरक्षेसाठी व भारतीय संविधानाच्या विरोधात जे युद्ध पुकारू इच्छितात त्यांच्या विरोधात तयार केलेला आहे.''

जनसुरक्षा कायद्याप्रमाणे कोणत्याही कडव्या विचारांच्या संघटना जर सार्वजनिक सुव्यवस्थेस किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका ठरत असेल तर त्यांना ताब्यात घेण्याची तरतूद आहे. एखाद्या संघटनेला बेकायदेशीर संघटना जाहीर करता येणार आहे. तसेच त्या संघटनेचे कार्यालय, परिसर, इतर संपत्ती जप्त करता येईल. बेकायदेशीर जाहीर झालेल्या संघटनांची बँकेतील खाती गोठवता येतील. बंदी घातलेल्या संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते नव्या नावाने संघटना उभारून हेच कार्य करत असतील तर नवी उभारलेली संघटना ही मूळ बेकायदेशीर संपत्तीचा भाग समजून बेकायदेशीर ठरवली जाईल.

कोणत्याही संघटना बेकायदेशीर आहेत असे शासनाने घोषित केल्यानंतर नेमण्यात आलेल्या सल्लागार मंडळाकडून त्याची विशेष तपासणी केली जाईल. सदर गुन्ह्याचा तपास उप पोलिस अधीक्षक अधिकारी करेल. सल्लागार मंडळात उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश अध्यक्ष असतील व त्याशिवाय सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे सरकारी वकील हे त्या समितीचे सदस्य असतील. गुन्हा दाखल होण्यापूर्वी पोलिस उप महानिरीक्षक यांची मान्यता घेणे अनिवार्य असेल.

सदर विधेयक विधानसभेत चर्चेस आले असताना विरोधी पक्षांनी त्यास कोणताही आक्षेप घेतला नाही. परंतु विधान परिषदेत सभात्याग करून एका पत्राद्वारे पुढील आक्षेप नोंदवले : बेकायदेशीर कृतीच्या संदिग्ध आणि व्यापक व्याख्या, जप्ती आणि अटकेचे अनियंत्रित अधिकार, जिल्हा न्यायालयांना पूर्णपणे वगळणे, सल्लागार मंडळाच्या रचनेत स्वतंत्र देखरेखीचा अभाव, योग्य प्रक्रियेशिवाय व्यापक पाळत ठेवणे आणि आर्थिक जप्तीचे अधिकार, समितीची अपारदर्शक आणि बहिष्कृत कार्यप्रणाली, समितीकडे आलेल्या हरकतींपैकी ९५०० हरकती या हे विधेयक रद्द करावे अशी मागणी करणाऱ्या होत्या पण त्यांची दखल घेण्यात आली नाही.

वरील हरकती सखोलरीत्या तपासल्यास स्पष्ट आहे की, बेकायदेशीर कृत्ये यांची व्याख्या सुस्पष्ट आहे व ज्या घटनाविरोधी, लोकशाही विरोधी व घटनेने स्थापन केलेली व्यवस्था उलथून टाकण्यासाठी अशी जी कृत्ये असतील त्यांनाच बेकायदेशीर कृती असे म्हटले आहे. सल्लागार मंडळ हे कायद्याने स्थापन केलेले विशेष मंडळ असल्यामुळे जिल्हा न्यायालयांना वगळण्याचा मुद्दा गैरलागू आहे. सल्लागार मंडळात उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश व उच्च न्यायालयातील सरकारी वकील सदस्य असल्यामुळे त्यांच्यावर देखरेख ठेवण्याची आवश्यकता नाही. सदर विधेयकास विरोध करण्यासाठी कोणतेही ठोस मुद्दे नसल्यामुळे विरोधकांचे आक्षेप हे निराधार आहेत. या कायद्याचा लोकशाही मार्गाने विरोध करणाऱ्यांविरुद्ध वापर होऊ नये यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्याप्रमाणे कोणत्याही संस्थेस गैरकायदेशीर जाहीर करण्यापूर्वी सर्व उपलब्ध पुरावे या कायद्याने प्रस्थापित विशेष सल्लागार मंडळापुढे ठेवावे लागतात.

या सल्लागार मंडळात उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायाधीश सदस्य आहेत व त्यांना त्याचे प्रमुख करण्यात आले आहे. सल्लागार मंडळाने मान्य केल्यानंतरच एखादी संस्था गैरकायदेशीर म्हणून जाहीर होते व त्यांच्या बेकायदेशीर कारवायांवर कारवाई करणे शक्य होते. त्यामुळे या कायद्याचा गैरवापर होईल अशी हाकाटी पिटणाऱ्यांना योग्य प्रत्युत्तर देण्यात आले आहे. अशा प्रकारचा कायदा उपलब्ध नसण्यामुळे मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर व अन्य अनेक ठिकाणी शहरी माओवादी वेगवेगळ्या माध्यमांतून सार्वजनिक सभा घेऊन गैरकायदेशीर कृत्यांना राजरोस प्रोत्साहन देत आहेत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स (टीआयएसएस) सारख्या केंद्रीय संस्था, राज्यातील अनेक विद्यापीठे व वसतिगृहे या ठिकाणी अशा गैरकायदेशीर कारवायांना प्रोत्साहन द्यायचे अड्डे बनले आहेत व त्यातून तरुणांमध्ये जातीय तेढ निर्माण करणे, धार्मिक दंगली पसरविणे, गैरकायदेशीर कृत्यांसाठी नेतृत्व निर्माण करणे, निधी व रसद गोळा करणे अशा कारवाया चालू आहेत.

विरोधी पक्षांच्या मते सध्याचे कायदेच वापरावेत पण सध्याच्या प्रचलित कायद्यामध्ये या गोष्टी चालत असलेल्या दिसत असून देखील प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांकडे किंवा न्यायसंस्थेकडे पुरेशा तरतुदी नाहीत. त्यामुळे राजकीय व्यक्तींचे खून होणे, दहशतवादी कृत्य होणे हे प्रकार चालू आहेत. त्यामुळे या विशेष कायद्याची आवश्यकता होती.

उबाठा शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले आहे की, ते सदर कायद्याविरुद्ध उच्च न्यायालयात जाणार आहेत. त्यामुळे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, छत्तीसगड, तेलंगणा, आंध्रप्रदेश व अन्य अनेक राज्यांनी विशेष जनसुरक्षा अधिनियम कायदा २००५ नंतर लागू केला आहे. भीमा कोरेगाव दंगलीतील आरोपी व शहरी माओवादी सुधा भारद्वाज यांनी पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टीज (पीयूसीएल) तर्फे छत्तीसगड उच्च न्यायालयात सदर कायदा रद्द करावा, तो बेकायदेशीर आहे, अशाप्रकारचा कायदा करण्यास राज्ये असमर्थ आहेत अशी मागणी केली होती. यद्यासंबंधी ११ एप्रिल २०१४ रोजी छत्तीसगडच्या उच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश व अन्य एक न्यायाधीश यांच्या खंडपीठाने हे सर्व आक्षेप अमान्य करत स्पट केले होते की, लोकांमध्ये भीती व दहशतवाद पसरू नये यासाठी राज्यांनी केलेला कायदा, कुठल्याही प्रकारे भारतीय राज्यघटनेच्या विरुद्ध नाही, तो तर्काला धरून आहे व त्यात बेकायदेशीर असे काहीही नाही. त्यामुळे अशाच प्रकारचा कायदा राष्ट्रविघातक अशा वर उल्लेखिलेल्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी करण्याची आवश्यकता आहे.

विशेष जनसुरक्षा विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यानंतर महाराष्ट्रात राहून महाराष्ट्रातील काही भागांत व अन्य नक्षलग्रस्त भागात डाव्या कडव्या चळवळीस सक्रिय पाठिंबा देणारे व जनप्रक्षोभ निर्माण करून घटनेने स्थापन केलेली लोकशाही व्यवस्था उलथवू पाहणाऱ्यांना चाप बसणार आहे; त्यामुळे आदिवासी, दलित, मजूर, विद्यार्थी, महिला यांच्या नावाने आक्रोश निर्माण करणे हे या संघटनांना शक्य होणार नाही. सदर कायद्याने महाराष्ट्र व देशातील सुदृढ लोकशाही बळकट होण्यास मोठी मदत होणार आहे हे नक्की. विरोधी पक्षांनी सदर विधेयकास पाठिंबा दिला असता तर त्यातून त्यांची लोकशाहीवरील निष्ठा व्यक्त झाली असती. सदर कायद्याचा गैरवापर करण्याचा भाजपप्रणीत सरकारचा कोणताही मानस नाही, हे शासनाने वारंवार अधोरेखित केले आहे.

(लेखक निवृत्त पोलिस महासंचालक आहेत.)

## रविवारची पत्रे

### दहशतवाद मानवतेचा शत्रू

अलिकडेच दहशतवाद, अमेरिकेची कथित मध्यस्थी यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अगदी निःसंदिग्ध भूमिका मांडली. या बाबींशी ज्या देशांचा संबंध आहे त्यांना ते समजून घ्यावे लागेलच. भारतातीलही पक्ष-विपक्ष यांनाही ते समजून पुढे जावे लागेल आणि त्यांच्या हरकती आणि आक्षेपांमुळे उगाच आपला शक्तिपात होणार नाही, याची खबरदारी घेण्यासाठी हे महत्त्वाचे आणि अत्यंत आवश्यकही आहे. भारत आणि पाकिस्तानच्या विषयावर आम्हाला कोणत्याही तिसऱ्या देशाची मध्यस्थी नको असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना स्पष्ट सांगितले होते. त्याचवेळी दहशतवादाबाबत दुहेरी निकष नकोत, असे त्यांनी जी-७ शिखर परिषदेत सांगितले. आणखी एक गोष्ट भारताच्या संदर्भात अशी घडली की, खलिस्तानवादी गटांकडून भारताच्या विरोधातील कारवायांसाठी कॅनडाचा वापर केला जात असल्याची कबुली खुद्द कॅनडाने दिली. त्यांच्या सुरक्षा विषयक संस्थेनेच हे मान्य केले असून त्यांनी हे मान्य करण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्याहून पुढची आणि ठळक बाब अशी की, जे खलिस्तानवादी कॅनडात सक्रिय होते त्यांना केवळ गट मानले जात होते. तथापि आताच्या अहवालात या गटांचा थेट दहशतवादी असाच उल्लेख करण्यात आल्यामुळे भारताचा हा एक मोठा राजनैतिक विजयही आहे.



झालेल्या घडामोडी वेगवेगळ्या भासत असल्या तरी त्याच्या मुळाशी एकच कारण आहे व ते म्हणजे दहशतवाद. पाकिस्तानने त्याला जिहाद, मुजाहिद्दीन, स्वातंत्र्यलढा असले लाख मुलामे दिले असले तरी अंत:स्थ हेतू भारताला जखम करणे हाच राहिला आहे. ज्यांच्या कोणाच्या मनात पाकिस्तानच्या दुष्कृत्यांबद्दल अद्याप सॉफ्ट कॉर्नर होता तेही पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर स्तब्ध झाले आहेत. कोणी भारताच्या बाजूने युद्धात उतरले नाही अथवा उतरावे, अशी अपेक्षाही नव्हती. मात्र ज्यांना एरव्ही पाकिस्तानातल्या कृत्यांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करण्याची सवय जडली होती, त्यांचीही अडचण निर्माण झाली आहे. भारताने आपल्या पद्धतीने पुढे जे काय करायचे ते केले आणि अनपेक्षित तडाखा बसल्यामुळे पाकिस्तानने युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला. तो भारत आणि पाकिस्तानातील अधिकारी स्तरावर झाला आणि त्यानुसार स्थगितीचा निर्णय झाला होता. यात अमेरिकेच्या अध्यक्षांची अनपेक्षित दखल झाली. युद्धबंदी अधिकृतपणे जाहीर करण्याच्या अगोदर त्यांनी ही माहिती समाजमाध्यमांतून दिली आणि नंतर जगभर फिरून किमान डझनभर वेळा त्याचा गवगवा केला गेला. वास्तविक दहशतवाद हा मानवतेचाच शत्रू आहे हे जगाला ओरडून सांगण्याची वेळ वारंवार का यावी हीच एक मोठी शोकांतिका आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

●● ●●

### 'ऊहापोह'

सकाळी सकाळीच काय कोण जाणे हा शब्द समोर आला. साधकबाधक चर्चेसंबंधात हा शब्द येत असावा. आणि याचा संबंध 'चहापोहे' या शब्दाशी असावा काय असे वाटून गेले. आपली मराठी भाषा, गंमतीशीरच असावी. बघाना 'ऊहापोह' शब्दाचा ओघ कसा आपल्या आवडीच्या 'चहापोहे'कडे वळला. गरमागरम कांदापोहे , तर्रीपोहे, बटाटापोहे , बघा खरीच भूक लागली आहे ना? तसे हे खरेच म्हणायचे. आपल्या परिचयाचा विषय, विवाह, दोन कुटुंबांत विवाहाआधी होणारी चर्चा डोळ्यासमोर आणा, कितीतरी विविध अंगांनी विचार होत असतो. ऊहापोहच म्हणूया आणि मग शेवटच्या बैठकीत चहापोहे होऊनच याची सांगता होत असते आणि खऱ्या अर्थाने दोन्ही कुटुंबे एकत्र येत असतात.

विचारांची साखळी आज शब्दाभोवतीच फिरते आहे. आपल्या मराठी भाषेत इतर अनेक भाषांतील शब्द आपसूकच आले असल्याचे आढळते. मला आठवते अनेक वर्षांपूर्वी क्रिकेटची कॉमेंट्री रेडिओ, ट्रांझिस्टरवर आम्ही ऐकत असू व ती इंग्रजीमध्येच असायची. असेच एकदा आम्ही मित्रमंडळी कॉमेंट्री ऐकत बसलो होतो, एवढ्यात एका मित्राचा मुलगा जवळ आला व विचारता झाला, हे सगळे वर्णन इंग्रजीत करतात. मात्र एकच मराठी शब्द 'आऊट' का वापरतात? आम्ही सगळेच हास्यात बुडालो. गंमत तर आहेच पण असे अनेक शब्द असतील व त्याचा मागोवा निश्चितच मनोरंजक ठरेल. माझा पुतण्या दुर्गेश, दुर्दैवाने आज तो आपल्यात नाही, आजच्या माता व लहान मुलगा/मुलगी यांच्यातील संवाद नाट्यमय रूपात रंगवून सांगत असे, जसे 'अरे अर्णव, तो डॉग तुला बाईट करेल ना! अरे लवकर कम. तुझी मिल्क ड्रिंकायची वेळ झाली बघ.' असाच काहीसा प्रकार पण खूप गंमत करायचा.

'शब्द' सकाळी सकाळी कसा फिरवतोय बघा. पंजाबी भाषेत हा नाम या अर्थाने संबोधतात. प्रभात समयी देवाचे नाव घ्यावे असे सांगतात पण आम्ही सामान्य, आम्हाला त्यात अर्थ दिसत नाही. 'अर्थाभोवती फिरते दुनिया' याचा अर्थ आम्हाला बरोबर कळतो पण या मायेच्या चक्रातून, जे आम्हाला जन्ममरणाच्या फेऱ्यात सतत फिरवत असते, बाहेर काढणाऱ्या नामाकडे आम्ही फिरकतच नाही.

या संदर्भात ज्ञानेवर माउलींची ओवी समोर आली.

ऐसे माझेनि नामघोषें ।<br>
नाहीचि करिती विश्वाची दु:खे ।<br>
अवघे जगचि महासुखे ।<br>
दुमदुमित भरले ॥

अर्थ : याप्रमाणे अर्जुना! माझ्या नामाचा घोष करीत असताना नामधारक आपलेच नाही तर सर्व जगताला भगवंताचे नाम ऐकवून सर्व जगाचे दु:ख नाहीसे करतो व अशा रीतीने संपूर्ण जग ब्रह्मसुखाने दुमदुमित करून सोडतो. शब्दाची ही सफर 'नाम' या शब्दावर स्थिरावली. मग कशी वाटली ही सफर? आता नामाच्या मार्गाने निघायचे ना?

**संजय विष्णू वेलणकर**/नागपूर

●● ●●

### कर्जबाजारी कुटुंबांच्या संख्येत वाढ चिंताजनक

काही दिवसांपूर्वी तरुण भारतात ''भारतीय कुटुंबांची बचत घटतेय'' या शीर्षकाचा लेख वाचला. लेखाला अनेक कंगोरे होते, जसं कर्ज घेण्याचं प्रमाण वाढलं ते बुडवण्याचंही प्रमाण वाढलं, गरज नसताना कर्ज घेतलं जाते वगैरे वगैरे. परंतु विचार केला की अशी प्रवृत्ती का वाढीस लागली त्याच उत्तर म्हणजे आर्थिक असमानता खूप वाढली आहे. एखाद्या जवळ खूप जास्त संपत्ती असते तर कोणापाशी काहीच नसते. दिवसेंदिवस ही दरी वाढतच आहे. सरकारही कधीच या असमानतेचा विचार करताना दिसत नाही. एकतर दारिद्र्य रेषेखालील लोक आरामात जगतात. त्यांना सगळ्या सरकारी योजना, जसे घरकूल योजना, आरोग्यासाठी आयुष्मान योजना, पीक विमा योजना, किसान सम्मान योजना या अनेक योजनांचा लाभ घेता येतो, तर श्रीमंत लोकांना कितीही महागाई वाढली किंवा कितीही वीज दर वाढले, तरी काही फरक पडत नाही. फक्त मरण हे सर्वसामान्य मध्यमवर्गीय लोकांचंच होतं. सगळे सणवार करावेच लागतात, मर्यादित उत्पन्नात सगळे सोंग करावे लागतात.

मुलांचे शिक्षण, सर्वसामान्य वर्गवारीतील मुलांना ना फी सवलत मिळत ना गुणांमध्ये सवलत मिळत, औषधोपचारासाठी कुठलीही सोय नाही. आजकाल महागाई इतकी वाढली की सर्वसामान्य कुटुंबाचं कंबरडं मोडल्याशिवाय राहत नाही. सरकारनेही कर्जबाजारी करण्यात भर टाकली. लोकांना क्रेडिट कार्ड घ्यायला प्रोत्साहन दिले जाते, २ मिनिटांत कर्ज मंजूर असे प्रलोभन दाखवले जाते आणि गरजू व्यक्ती या प्रलोभनाला बळी पडते. सामान्य व्यक्तीला मुला-मुलीच्या लग्नासाठी खूप खर्च येतो. कर्ज घेऊन लग्न करतात व नंतर कर्ज फेडू शकत नाही अशी बिकट अवस्था होऊन गेली आहे. नोकरी करत असेल तरी मिळणाऱ्या उत्पन्नावर कर द्यावा लागतो, निवृत्त झाल्यानंतरही रक्कम मिळते त्यावर ही भरमसाट कर द्यावा लागतो. आजही देशात १ कोटी लोक असे आहेत की ज्यांनी ३५ वर्षे सरकारी नोकरी, खाजगी नोकरी, लहान-मोठा व्यवसाय केला आहे, त्या लोकांना पेन्शन नाही. ते ९५ या सदराखाली येतात. त्यांचे हाल तर बघवत नाही. ते पूर्णपणे मुला-मुलींवर अवलंबून असतात. औषधासाठी सुद्धा त्यांना सरकार सवलत देत नाही. मुला-मुलीकडे जायचे असेल तर रेल्वे सवलत सुद्धा काढून टाकली आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक व पेन्शनधारकांचे खूप हाल होताना दिसत आहेत. एकीकडे राज्य सरकार अतोनात खर्च करीत आहे, पण या पेन्शनधारकांचा विचार करताना कोणी दिसत नाही. उलट रोज समाज माध्यमावर खोट्या बातम्या पसरतात व पेन्शनधारकांच्या जखमेवर मीठ चोळत असतात. त्याला सरकार आळा घालत नाही.

सरकारने जर या विषयात लक्ष घातलं तर अनेक कर्जबाजारी कुटुंबे कर्जातून बाहेर निघू शकतात. कर आकारणी करताना वर्ग ३ आणि त्याखाली असलेल्या कर्मचाऱ्यांना करातून सवलत देऊन द्यावी. अशी किती रक्कम त्यांना मिळते? सवलत दिली तर त्यांना मोठा दिलासा मिळू शकतो. लेख खरंच वास्तविकता दर्शवतो. ही वास्तविकता आणि आर्थिक विषमता, असामानता दूर करायची असेल तर सरकारच यावर उपाययोजना करून सर्वसामान्य वर्गातील लोकांना न्याय देऊ शकेल असे वाटते.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# औंढा नागनाथ येथे सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला योजनांचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
औंढा नागनाथ तालुक्यातील सर्व विभागांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आढावा घेण्याच्या उद्देशाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभाग प्रमुखांच्या बैठकीचे आयोजन येथील शासकीय विश्राम गृहात शुक्रवारी सकाळी ११ वाजता करण्यात आले होते. यावेळी अनेक विभागांच्या कामांवर नाराजी व्यक्त करीत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांना कडक सूचना केल्या.

औंढा नागनाथ येथे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली तालुक्यातील सर्व प्रमुख विभागाच्या विभाग प्रमुखांची आढावा बैठक शुक्रवारी दिनांक ११ जुलै रोजी घेण्यात आली.बैठकीत पंचायत समिती, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, तालुका कृषी कार्यालय, सहाय्यक निबंधक कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर पंचायत, वन विभाग, तालुका आरोग्य विभाग यांच्यासह विविध विभागांच्या विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. यामध्ये पंचायत समितीच्या महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत प्रलंबित घरकुल, सिंचन विहीर, सार्वजनिक विहीर यासह खडीकरण, पांदण रस्ते, अतिक्रमण व इतर कामांबाबतीत आढावा घेण्यात आला. यावेळी मग्रारोह्योच्या अनेक कामत विसंगती आढळून आल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना धारेवर धरत कडक कार्यवाहीच्या सूचना दिल्या, तसेच ग्रामीण पाणी पुरवठा, तालुका कृषी विभाग, महिला व बाल विकास विभाग यांच्या कामावर नाराजी व्यक्त केली व कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिले. त्याच प्रमाणे शासनाच्या विविध योजनांचे पूर्ण ताकदीने राबविण्याच्या सूचना त्यांनी केल्या. बैठकीत अपर जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाडे, गटविकास अधिकारी गोपाळराव कल्हारे, मुख्याधिकारी गणेश गांजरे, साबा उप अभियंता चंद्रकांत कलेटवाड, ग्रामीण पाणी पुरवठा उप अभियंता राजू नरवाडे, पशु आयुक्त अधिकारी डॉक्टर विठ्ठल बुचाले, भूमी अभिलेख पी महालकर, पशुसंवर्धन अधिकारी पारवेकर,तालुका कृषी अधिकारी एस संघेकर, गटशिक्षणाधिकारी रवी कवडे

निवडणूक नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, महसूल नायबतहसीलदार प्रवीण ऋषी,पुरवठा निरीक्षण अधिकारी हेमा खाडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ गजानन चव्हाण,कृषी अधिकारी सुभाष पाचपुते, दीपक रानगोते पंकज शिंदे एस इंगळे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी या आढावा बैठकीस उपस्थित होते.

# मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची चार अंगणवाडींना भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
वसमत तालुक्यातील चार अंगवाड्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी शुक्रवारी भेट दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी चटईवर बसून अंगणवाडीतील बच्चे कंपनीसोबत मनमोकळा संवाद साधत पोषण आहाराची चवही घेतली.

हिंगोली जिल्ह्यातील अंगणवाड्यामध्ये बालकांना पोषण आहार सोबतच पूर्व प्राथमिक अभ्यासक्रमही शिकवला जातो. अंगणवाड्या सुसज्ज असल्यामुळे हसत खेळत बालके शिक्षणाचा आनंद घेत आहेत. तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांनी अंगणवाड्यांचा एकसमान रंगाचा उपक्रम हाती घेतला होता. त्यानुसार अंगणवाड्यांची एक समान रंगरंगोटी करण्यात आली आहे.

दरम्यान अंगणवाडीच्या योजनांची अंमलबजावणी व बालकांना दिला जाणारा पोषण आहार यासह इतर कामकाजाची माहीती घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी शुक्रवार दि ११ जुलै रोजी वसमत तालुक्यातील आरळ येथील दोन तर बाराशिव व आसेगाव येथील अंगवाड्यांना भेट दिली. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय बोराटे, प्रकल्प अधिकारी प्रिया लखमोड, पर्यवेक्षिका पल्लवी राठोड, प्राजक्ता रणेर यांची उपस्थिती होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी अंगणवाडीचया इमारतीची पाहणी केली. अंगणवाडीत ठेवण्यात आलेल्या धान्याची साफसफाई, धान्य ठेवण्याची जागा याचीही पाहणी केली. याशिवाय बालकांची उंची, वजन नियमितपणे घेऊन त्यांची ऑनलाईन व ऑफलाईन नोंदी ठेवण्याच्या सूचना दिल्या. बालकांना पोषण आहार देतांना व्यवस्थीत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या. अंगणवाडीसाठी सौर उर्जेचा वापर करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी बालकांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांच्याशी संवाद साधला.

# शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयात सेवापूर्ती सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय येथील उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट, पर्यवेक्षक तुलसीदास चीलमुल, कार्यालयीन अधीक्षक ओम श्रीलेले यांची नियत वयोमानानुसार ३० जून २०२५ रोजी सेवा समाप्त झाली. यानिमित्त त्यांचा सेवापूर्ती सोहळा दि १२ जुलै शनिवारी संपन्न झाला.



तीनही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे सपत्नीक सत्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक ॲड गयबाराव नाईक, ॲड केशवराव शिरसाट, पंडितराव बांगर, कमल बगडिया, बाळासाहेब नाईक तसेच भारतीय विद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती भालेराव व विद्यालयाचे सर्व अध्यापक अध्यापिका.सेवानिवृत्त झालेल्या तिन्ही अध्यापकांचे मित्र मंडळी व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ प्रकाश अंभोरे होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कुलकर्णी यांनी केले.



**हिंगोली– येथील जिजामाता नगर व इतर नगरांना जोडणारा रेल्वे स्थानकावरील दादरा पाडण्यात येत आहे. हा पुल अतिशय अरूंद असल्यामुळे या पूलावरून वाहतुक करतांना अनेक समस्या निर्माण होत होत्या. आता रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण होत असून या ठिकाणी प्रशस्त असा दादरा बांधण्यात येणार असल्याचे रेल्वेच्या सुत्रांनी सांगितले. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### गयाबाई गलंडे यांचे अल्पशा आजाराने निधन



हिंगोली– कनेरगाव नाका येथील गयाबाई भानुदास गलंडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी कनेरगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने सर्व राजकीय पक्षातील लोकप्रतिनिधी, नेते, पदाधिकारी तसेच नागरिक उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली तसेच नातवंडे असा मोठा परिवार आहे. बालाजी गलंडे यांच्या त्या मातोश्री होत.

### मागासवर्गी विद्यार्थ्यांनी लॅपटॉप खरेदीसाठी ३१ जुलैपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

हिंगोली–जिल्हा परिषद हिंगोली यांच्यामार्फत सेस योजना सन २०२५–२६ अंतर्गत २० टक्के मागासवर्गीय कल्याण निधीमधून ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना लॅपटॉप खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र विद्यार्थ्यांना अर्ज/प्रस्ताव सादर करण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी गीता गुठ्ठे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. या योजनेअंतर्गत पूर्वीची अंतिम मुदत २५ जून २०२५ ही दिली होती. परंतु अधिक गरजू विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळावा या उद्देशाने प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत वाढवून ३१ जुलै २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. अर्जदारांनी संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती अथवा जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांच्याकडे आपले पूर्ण प्रस्ताव कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावा. तो वैद्यकीय आणि अभियांत्रिकी यासारख्या पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेत असावा. ही योजना डीबीटी तत्वावर राबवण्यात येणार असल्यामुळे लाभार्थ्यांनी प्रथम लॅपटॉप खरेदी करावा व मूळ खरेदी बीलासह प्रस्ताव सादर करावा. त्यानंतर खरेदी किंमती इतके, परंतु कमाल ३० हजार रुपये अनुदान लाभार्थ्याच्या बँक खात्यावर थेट जमा करण्यात येईल. विलंबाने आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असे सांगितले आहे.

### ५७ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५७ वाहन चालकांवर जिल्ह्यात शनिवारी विविध पोलिस ठाण्यांतर्गत कारवाई करण्यात आली. यावेळी वाहन चालकांकडून ६३ हजार २५० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ४ ठिकाणी अवैधदारू विक्री करणाऱ्या ठिकाणावर छापे टाकून मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# कनेरगाव नाका येथे आगीत ३ दुकाने खाक, लाखोंचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
तालुक्यातील कनेरगाव नाका येथे तीन दुकानांना शनिवारी रात्री साडेआठच्या सुमारास अचानक आग लागून दुकानातील साहीत्य जळून खाक झाले आहे. यामध्ये लाखोंचे नुकसान झाल्याचा अंदाज असून वाशिम येथील अग्नीशमन दलाने घटनास्थळी पोहचून आग आटोक्यात आणली. सदरील आग शॉर्ट सर्कीटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त केल्या जात आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, कनेरगाव नाका येथे अनिल वानखेडे यांचे आचल बुट हाऊस, नितीन पठाडे यांचा फोटो स्टुडीओ, विष्णू मुळे यांचे एक सलूनचे दुकान आहे. शनिवारी रात्री साडेआठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास आचल बुट हाऊस या दुकानाला अचानक आग लागली. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केल्याने आगीची झळ फोटो स्टुडीओ आणि सलूनच्या दुकानापर्यंत पोहोचली. यात तीनही दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले.

या आगीची माहीती मिळताच गणेश गावंडे, सुरेश गावंडे, सुमीत घुगे, सचिन पठाडे, शुभम नेमाडे, साईराज गोडघासे, हनुमान गावंडे, गणेश महाले, बालाजी गावंडे यांनी घटनास्थळी जाऊन आगीवर पाणी ओतण्यास सुरूवात केली. मिथून घेवारे यांनी त्यांच्या ट्रॅक्टरमध्ये पाणी आणून आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर हिंगोली नगर पालिका व वाशिम नगर पालिका येथील अग्नीशमन दलाला संपर्क साधण्यात आला. अग्नीशमन दल पोहोचण्यापूर्वी दुकानातील साहीत्य जळून खाक झाले परंतु पथकाने तत्काळ आगीवर नियंत्रण मिळवल्यामुळे आग पसरली नाही. घटनास्थळी बासंबा पोलिस ठाण्याचे सपोनि विकास आडे, उपनि मदन गव्हाणे यांच्या पथकाने भेट दिली.

# अकरावी प्रवेशासाठी लाच मागणाऱ्या माजी प्राचार्याविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
तालुक्यातील भांडेगाव येथील सुखदेवानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील माजी प्राचार्य तथा कार्यकारी मंडळातील सदस्य प्रकाश निरगुडे याने तक्रारदाराकडे ११ वी प्रवेशासाठी दोन हजार रूपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माजी प्राचार्य प्रकाश निरगुडे याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की, सध्या ११ वीसाठी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. तक्रारदाराच्या मुलीला सुखदेवानंद विद्यालय भांडेगाव येथे प्रवेश मिळणार असा मेसेज त्यांच्या मोबाईलवर आला होता. त्यामुळे दि १ जुलै रोजी तक्रारदार यांना सुखदेवानंद विद्यालय येथे मुलीच्या प्रवेशासाठी बोलावले. त्यावरून तक्रारदार गेले असता माजी प्राचार्य तथा संस्थेचे कार्यकारी मंडळातील सदस्य प्रकाश चक्रधर निरगुडे यांनी तक्रारदार यांना ११ वी प्रवेशासाठी ३ हजार द्यावे लागतील तरच तिचा प्रवेश आमच्या महाविद्यालयात करून अन्यथा तुमच्या मुलीचा आम्ही प्रवेश करणार नाही असे म्हणून लाचेची मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दि २ जुलै रोजी तक्रार दिली होती.

या तक्रारीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली. यावेळी पंच साक्षीदार सुखदेवानंद विद्यालयाचे माजी प्राचार्य तथा कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रकाश निरगुडे यांनी पंचासमक्ष ३ हजार रूपये लाचेची मागणी केली. यावेळी तक्रारदार यांनी निरगुडे यांना रक्कम कमी करण्याची विनंती केली. अखेर २ हजारावर तडजोड करण्यात आली. ही २ हजाराची लाच स्विकारण्यास सहमती दर्शवली. वास्तविक शासकीय नियमाप्रमाणे ६६८ रूपये शुल्क भरणे अपेक्षीत असतांना २ हजार लाचेची मागणी केली. यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने प्रकाश निरगुडे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला असून सदरील कार्यवाही पोलिस अधीक्षक संदीप पालवे, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ संजय तुंगार, उपअधीक्षक विकास घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि राजेश मलपिल्लू, जमादार राजाराम फुपाटे, रवींद्र वरणे, शिवाजी वाघ, विनोद पुंडगे, शेख अकबर यांच्या पथकाने केली आहे.

# औंढा नगर पंचायतीतर्फे ५ स्टार औंढेकर अभिनव उपक्रम, जिल्हाधिकाऱ्यांचेहस्ते वृक्षारोपन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
औंढानागनाथनगरपंचायतच्यावतीने ५ स्टार औंढेकर या अभिनव उपक्रमा अंतर्गत औंढा शहरातील मोकळ्या जागेमध्ये जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.



हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा संकल्पनेतून स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान, ५ स्टार औंढाकर हा अभिनव उपक्रम नगरपंचायत औंढा मार्फत हाती घेण्यात आला आहे. जल पुनर्भरण, घराभोवती किमान पाच झाडे लावणे, कचऱ्याचेस्त्रोतावरच वर्गीकरण, रुफस्टॉप सोलर पॅनल ( पीएम सूर्यघर योजना) औंढा नगरपंचायत मार्फत आकारण्यात येणाऱ्या करांचा नियमित व वेळेवर भरणा या उपक्रमातील हे निकष आहेत. शहरातील मालमत्ता धारकांनी या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग नोंदविण्यात यावा. पात्र मालमत्ता धारकांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या योजनेमध्ये औंढा शहरातील सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूचे दर्शन घेऊन महापूजा केली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी नागनाथ मंदिराची माहिती जाणून घेतली. तसेच विकास कामाची पाहणी केली.

औंढा नागनाथ शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील मोकळ्या जागेवरील उद्यानात झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यात पिंपळ बदाम गुलमोहर वड वेगवेगळ्या फुलांची झाडे यांचे वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते पिंपळ झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाडे, नगराध्यक्ष सपना कनकुटे, मुख्याधिकारी गणेश गांजरे व नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच ५ स्टार औंढेकर या अभिनव उपक्रमात बसलेल्या पाच नागरिकांचा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, तहसीलदार हरीश गाडे, मुख्याधिकारी गणेश गांजरे नगराध्यक्ष सपना कनकुटे नगरसेविका कुंताबाई गोबाडे, विजय महामुने, अनिल नागरे, वैभव पांडे, राधा काळे, मंजुषा जाधव, विष्णू रणखांबे, सतीश रणखांबे नागेश बुरकुले, मनोहर रणखांबे यांच्यासह नगरपंचायतचे कर्मचारी व नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना अनिल नागरे सूत्रसंचालन वैभव पांडे आभार प्रदर्शन विजय महामुने यांनी मानले.

# दारूबंदी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १३ जुलै**
वसमत तालुक्यातील बेळगाव येथे अवैधदारू विक्री मोठ्या प्रमाणात होत असून यामुळे गावातील तरूण मंडळी व्यसनाधीन होत असून अनेकांचे संसार उध्वस्त होत आहेत. तळीरामांचा गावातील लोकांना त्रास होत आहे. गावात कायदा व सुव्यवस्था बिघडत आहे. त्यामुळे गावातील अवैध दारू विक्री बंद करावी तसेच गावात दारूबंदी करण्यात यावी अशी मागणी गावकऱ्यांनी शनिवारी हिंगोली येथील राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकाऱ्यांकडे केली आहे. यावेळी ॲड प्रज्ञावंत मोरे, ईश्वर जावळे, गुलाब ढोकणे, नागेंद्र लांडगे यांच्यासह पुरूष महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## परळीत गुरु महिमेचा गजर... ! दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या

# गुरूपोर्णिमा उत्सवाला भाविकांची मोठी गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ जुलै**


दिव्य ज्योति जागृती संस्थान लातूर शाखेच्या वतीने प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने हालगे गार्डन परळी वैजनाथ येथे गुरूपोर्णिमा महोत्सव अत्यंत भव्य, दिव्य व भक्तिमय वातावरणात मोठया उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला हजारो भाविकांनी उपस्थित राहुन गुरूचरित्राचा महिमा अनुभवला.

कार्यक्रमाची सुरूवात परळी शहरातील मान्यवरांच्या हस्ते पवित्र दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर श्री गुरूंची आरती, भजने व भक्तीमय वातावरणात संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला. यानंतर प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या दिल्ली येथील सुप्रसिद्ध भागवत भास्कर कथा व्यास सुश्री पद्महस्ता भारतीजी यांनी आपल्या सुमधूर वाणीतील प्रवचनातून गुरूंचे जीवनातील स्थान, त्यांची शास्त्रोक्त महती, अध्यात्मिक मार्गदर्शनाचे महत्व यावर सखोल विचार मांडले. त्यांनी वेद-उपनिषदे तसेच विविध संतांच्या उदाहरणांच्या माध्यमातून गुरू हा एकमेव असा दीपस्तंभ आहे, ज्यो अज्ञानातून ज्ञानाकडे वाट दाखवतो, असे ठामपणे सांगितले. यावेळी अनेक भाविकांना त्यांच्या प्रवचनातून नवचैतन्य व सकारात्मक प्रेरणा मिळाल्याचे जाणवले.

परळी येथील हालगे गार्डन येथे आज रविवार दि.१३ जुलै रोजी दिव्य ज्योति जाग्रति संस्थानच्या वतीने आयोजित गुरू पोर्णिमा उत्सव २०२५ प्रसंगी प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री पद्महस्ता भारतीजी बोलत होत्या. कार्यक्रमस्थळ भक्तांनी आकर्षकरित्या सजविल्याने आनंदी व भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

परिसरात रांगोळी काढून आणि सुशोभिकरण केल्याने वातावरण प्रसन्न दिसत होते. प्रवेशद्वारालाच प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांचे आकर्षक स्वरूप एका सुंदर मंदिरात दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. या मंदिरापुढेही आकर्षकरित्या काढलेली रांगोळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती. सत्संग परिसरात विविध साहित्याचे स्टॉल लावले होते.

आपल्या सत्संग कार्यक्रमातून सुश्री पद्महस्ता भारतीजीनी गुरू कोण असावा ? यापासून शिष्यापर्यंतची संपूर्ण व्याख्या अतिशय सहजतेने व विविध उदाहरणासह स्पष्ट केले. ते म्हणाले की, गुरू सेवा ही सर्वश्रेष्ठ असून ही सेवा श्री हनुमंतासारखी पारदर्शक असावी. श्रीराम व हनुमान यांचे संदर्भ उदाहरण देवून सुश्री पद्महस्ता भारतीजी पुढे म्हणाल्या की, गुरू हा बुद्धीचा राजा असून गुरू व शिष्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात. जीवन जगत असतांना आपणास अनेक अडचणी येत असतात. परंतू या अडचणीतूनही सदाचाराचा मार्ग दाखविण्याचे काम आपले गुरू नकळतपणे करीत असतात त्याकरीता गुरूवर विश्वास असणे अत्यंत आवश्यक असून अनेकदा गुरू शिष्याची परिक्षा घेतो तेंव्हा शिष्याने त्या प्रसंगाला तन्मयतेने तोंड दिले पाहिजे असे सुश्री पद्महस्ता भारतीजी म्हणाल्या. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, भारत हा




गुरू परंपरेवर विश्वास ठेवणारा, त्यांना मानणारा असून गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते. अर्थातच श्रद्धा, विश्वास, विनम्रता व शालीनता शिष्यात असणे आवश्यक असून अशा सदाचारी व्यक्तीला गुरूवर्य योग्य मार्ग दाखवून त्याचे कल्याण करतात असे विचार प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री पद्महस्ता भारतीजी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात बोलतांना पण.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या कृपापात्र शिष्या सुश्री अन्नपूर्णा भारतीजी यांनी सांगितले की, सध्याचे जीवन अत्यंत खडतर असून स्पर्धेच्या युगात मानव नाहकपणे भरकटत आहे. अशावेळी गुरू त्यांना योग्य मार्ग दाखवून कल्याणाचा महामंत्र देतो असे त्या म्हणाल्या. दरम्यान सर्वश्री आशुतोषजी महाराज हे आम्हा सर्वांचे गुरू असून त्यांनी दिलेली शिकवण आमच्या जीवनाचे सार्थक करण्यास उपयुक्त ठरेल असा विश्वास सुश्री अन्नपूर्णा भारतीजी यांनी व्यक्त केला.

### गुरू-शिष्य परंपरेतूनच विश्वात्मक कल्याण साध्य होते – सुश्री पद्महस्ता भारतीजी

### सदगुरूच योग्य मार्ग दाखवून कल्याणाचा महामंत्र देतो –सुश्री अन्नपूर्णा भारतीजी

या कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरूचरणी विविध भजने सादर करण्यात आली. टाळ तसेच संगीताच्या स्वरध्वनीवर गुरू पोर्णिमा उत्सव व सभागृह अक्षरश: मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते प.पू.सर्वश्री आशुतोषजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व आरती करण्यात आली. व्यासपीठावर सुश्री लक्ष्मी भारतीजी, सुश्री धनश्री भारतीजी आदी उपस्थित होत्या.

यावेळी उपस्थित साधक व भक्त टाळ्यांच्या गजरामध्ये भजनात सहभागी झाले होते. परळीसह अंबाजोगाई, सोनपेठ, गंगाखेड, नांदेड, सिरसाळा,माजलगाव, कळंब, केज, लातूर आदी ठिकाणाहून भाविकांची अलोट गर्दी या सत्संग सोहळयास लाभली होती. गुरूपोर्णिमेच्या या कार्यक्रमामुळे परळी शहरात धार्मिकतेचे भरगच्च वातावरण दिसून येत होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिव्य ज्योति जागृती संस्थानच्या परळी शाखेच्या सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या कार्यक्रमातून उपस्थित भाविकांनी अध्यात्मिक समाधान व गुरूसेवेचा प्रसाद घेवून आनंद व्यक्त केला.

## पत्रकार शेख मुकरम यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ जुलै**



समाजहितासाठी नेहमी पुढाकार घेणारे परळी शहरातील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार शेख मुकरम यांची अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधी समितीच्या मराठवाडा विभाग संपर्कप्रमुखपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत संस्थेच्या वतीने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आगामी काळात मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये समितीचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याचा निर्धार पत्रकार शेख मुकरम यांनी व्यक्त केला आहे. या निवडीमुळे सामाजिक, राजकीय तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.समाजातील अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराविरोधात ठामपणे आवाज उठवणं हीच खरी सेवा असून, या जबाबदारीला प्रामाणिकपणे न्याय देईन, असा विश्वास शेख मुकरम यांनी निवडीनंतर व्यक्त केला.

## यावर्षी वाढदिवस सोहळा साजरा करणार नाही–धनंजय मुंडे

सहकारी - कार्यकर्त्यांनी बॅनर, जाहिराती ऐवजी सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन
१५ जुलै रोजी भेटीसाठी उपलब्ध नसणार - मुंडेंच्या कार्यालयाकडून माहिती

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा येत्या १५ जुलै रोजी वाढदिवस असून, यावर्षी आपण वाढदिवस साजरा करणार नसून सहकारी व कार्यकर्त्यांनी वाढदिवसाचे सोहळे आयोजित करू नयेत, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी केले आहे.

धनंजय मुंडे यांचा वाढदिवस हा दरवर्षी चाहते व कार्यकर्त्यांसाठी मोठी पर्वणीच असतो, मात्र यावर्षी मराठवाड्यात बहुतांश भागात पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आहे, दुसरीकडे नुकतेच जवळचे सहकारी स्व.आर.टी. देशमुख यांचे झालेले निधन आदी बाबींचा विचार



करून धनंजय मुंडे यांनी वाढदिवस साजरा करणार नसून, सहकारी-कार्यकर्त्यांनी बॅनर बाजी, जाहिराती आदिंवरील खर्च टाळून त्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले आहे. धनंजय मुंडे यांना काही दिवसांपूर्वी बेल्स पाल्सी या आजाराचे निदान झाले होते. त्यानंतर विविध उपचार घेऊन मुंडेंनी इगतपुरी येथील ध्यान केंद्रात विपश्यना देखील केली.

आ. धनंजय मुंडे हे येत्या १५ जुलै रोजी ध्यानसाधना करणार असून, ते वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा स्वीकारण्यास परळी वैद्यनाथ किंवा मुंबई वा अन्य कुठेही उपलब्ध असणार नाहीत, असे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने कळवण्यात आले आहे.

### कचरा कुंड्या ओरफ्लो



बीड शहरातील रस्त्यांवर अनेक भागात कचरा कुंड्या ओरफ्लो आहेत. तर काही ठिकाणी रस्त्यावरच कचरा टाकला जात आहे.

## धारूर येथील गिरीराज नागरी सहकारी पतसंस्थेची ३४ वी सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१३ जुलै**

धारूर येथील गिरीराज नागरी सहकारी पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेत संस्थेच्या पुढील वाटचालीसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून, विविध नाविन्यपूर्ण आणि सामाजिक उपक्रमांवर भर देत संस्थेचे कार्य अधिक वाढवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

गेल्या ३४ वर्षांपासून सहकार क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करून, गिरीराज नागरी सहकारी पतसंस्थेने एक उत्कृष्ट पतसंस्था म्हणून नावलौकिक मिळवला आहे. संस्थेच्या सभागृहात संपन्न झालेल्या या सभेत ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन हे अध्यक्षस्थानी होते, तर संस्थेचे चेअरमन अनिल चिद्रवार आणि सर्व संचालक प्रमुख उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने सभेची सुरुवात झाली.

संस्थेचा वार्षिक अहवाल संस्थेच्या सचिव सरिता वेदपाठक यांनी सादर केला. यावेळी संस्थेचे चेअरमन अनिल चिद्रवार यांनी संस्थेच्या कार्याबद्दल आणि विविध उपक्रमांबद्दल माहिती दिली. सभासदांचे हित समोर ठेवून संस्था कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले आणि विविध ठराव मांडण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात अनिल महाजन यांनी संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट केला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुमंतराव डुबे आणि माजी



नगराध्यक्ष विठ्ठलराव जाधव यांनी सहकारातून या भागाचा विकास साधता येतो, तसेच बाजारपेठेतील नवीन व्यावसायिकांना आर्थिक सहकार्य मिळावे या हेतूने ही संस्था सुरू केली, असे महाजन यांनी सांगितले. पश्चिम महाराष्ट्राच्या धर्तीवर आजही ही संस्था आर्थिकदृष्ट्या मजबूत असून, आपली पाळेमुळे घट्ट रोवून आहे. यापुढेही संस्थेचे हित लक्षात घेऊन सर्व संचालक आणि सभासद काम करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुकही केले.यावेळी संचालक बालासाहेब जाधव आणि परमानंद तोष्णीवाल यांनीही आपल्या भाषणातून संस्थेच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे संचालक अनंत काळे यांनी केले.या सभेला संस्थेचे संचालक बालासाहेब जाधव, परमानंद तोष्णीवाल, आनंद भावठानकर, अनंत काळे, आप्पाराव भुतकर, नारायण फुलपगार यांच्यासह संस्थेचे सभासद आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ७२ श्वान,व ९ मांजरींचे झाले मोफत लसीकरण

### रोटरी क्लब व पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ जुलै**

जागतिक पशुसंक्रमित आजार दिनानिमित्त शुक्रवारी रोटरी क्लब अंबाजोगाई सिटी व पशुसंवर्धन विभाग, रॉट्रॅक्ट क्लब यांच्या वतीने तालुका लघु पशुवैद्यकीय चिकित्सालय येथे शहर व परिसरातील ७२ श्वान व ९ मांजरींचे मोफत श्वान दंश लसीकरण रेबीज, करण्यात आले.पाळीव प्राणी श्वान,मांजर यांचा प्रादुर्भाव होऊ नये. यासाठी प्रतिबंधित लस दिली जाते. हे लसीकरण ७२ श्वान व ९ मांजरींना करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ अनिल केंद्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, रॉट्रॅक्टचे मयूर परदेशी,डॉ.रश्मी ठाकूर, डॉ.रतन तडेकर, रोटरीचे धनराज सोळंकी, राधेश्याम



लोहिया,रुपेश रामावत ,विश्वनाथ लहाने,जगदीश जाजू,.विवेक गंगणे ,स्वप्नील परदेशी,अजित देशमुख,आनंद कर्नावट , प्रा.अजय पाठक,सचिन बेंबडे मयूर परदेशी, संदीप जाधव,सतीश चौधरी,डॉ.अभिजित काळे, डॉ.अक्षय मुसळे,डॉ बी एम.शिंदे डॉ.आभिषेक आबुज स्वप्नील बिराजदार यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजना मागची भूमिका प्रा.रोहिणी पाठक यांनी सांगितली.

का करायचे लसीकरण?

पशू पासून माणसांना व माणसांपासून पशू यांना रेबीज हा आजार श्वान अथवा मांजर व इतर पशु यांच्या पासून हा घातक आजार उद्भवतो. या आजारा पासून बचाव करण्यासाठी पशू मालकांनी दर वर्षी प्राण्यांचे लसीकरण करणे बंधनकारक आहे.यामुळे पिसाळलेल्या पशू पासून संरक्षण मिळते.

:- डॉ.अनिल केंद्रे,
सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन विभाग,अंबाजोगाई.

## जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने निबंध स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ जुलै**

जागतिक युवा कौशल्य दिनाच्या निमित्ताने जन शिक्षण संस्थान बीड व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने वतीने युवा कौशल्य सप्ताह सुरू आहे. दिनांक १२ जुलै रोजी काकडहिरा, अंकुश नगर, चौसाळा, गांधीनगर, एकता नगर, रायगड कॉलनी, संत नामदेव नगर, मित्र नगर, गेवराई,पाटोदा इत्यादी ठिकाणी सुरू असलेले असिस्टंट ड्रेस मेकर ब्युटी केअर असिस्टंट हॅन्ड एम्ब्रोईडरी प्रशिक्षणातील १२१ प्रशिक्षणार्थींनी *कौशल्य विकास काळाची गरज* या विषयावर निबंध लेखन स्पर्धेत सहभाग घेऊन सर्वच प्रशिक्षणार्थींनी अभ्यासपूर्ण निबंध लिहिले आहेत. या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संबंधित विषयांच्या प्रशिक्षिका बरोबरच जन शिक्षण संस्थानच्या सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. दिनांक १५ जुलै २०२५ रोजी जागतिक युवा कौशल्य दिनाच्या दिवशी यशस्वी स्पर्धकांना




मान्यवरांच्या हस्ते बक्षीस प्रधान करून त्यांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक श्री गंगाधर जी देशमुख यांनी सांगितले.

## होमिओपॅथी डॉक्टरांना ऍलोपॅथी उपचार करण्याची मुभा नाहीच

# मिक्सोपॅथी विरूद्ध आयएमएचा लढा यशस्वी

**इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ जुलै**

होमिओपॅथी डॉक्टरांना ऍलोपथीचा उपचार करण्याची मुभा राज्य सरकारने एक वर्षाच्या सीसीएमपी या ब्रिज कोर्स द्वारे दिली होती. तसेच एका शासन निर्णयाद्वारे हा कोर्स केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या नोंदणी रजिस्टर मध्ये नोंदणी करण्याविषयी मान्यता दिली होती. इंडियन मेडिकल असोसिएशनने या निर्णयाला तीव्र आक्षेप नोंदवीत या विरूद्ध सरकारकडे दाद मागितली. मिक्सोपॅथी विरूद्ध आयएमएचा लढा अखेर यशस्वी झाला. अशी माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी दिली आहे.

या विषयावर प्रसंगी महाराष्ट्रमध्ये इंडियन मेडिकल असोसिएशन, मार्ड संघटना, मॅग्मो संघटना यांचा बेमुदत बंद पुकारण्यात येईल असा इशाराही सरकारला दिला होता. या अनुषंगाने इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.संतोष कदम, सचिव डॉ.अनिल आव्हाड, डॉ.मंगेश गुलवडे, डॉ.शिवकुमार उत्तुरेसह इतर शिष्टमंडळ मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांना अधिवेशन काळामध्ये भेटले व हा निर्णय सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने चुकीचा आहे तसेच जनतेच्या सर्वसाधारण आरोग्य विषयक हक्कांच्या मूलभूत अधिकाराविरूद्ध आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य जनतेला आरोग्यविषयक नुकसान होऊ शकते तसेच बारावीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा हा निर्णय असल्याचे माननीय मुख्यमंत्री यांना सांगितले. बारावीनंतर वैद्यकिय पात्रता परीक्षा देऊन त्याआधारे एम.बी.बी.एसला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचेही सरकारच्या निदर्शनास आणून दिले. तसेच मिक्सोपॅथीमुळे रूग्णाला कोणत्या डॉक्टरकडे कोणता विलाज करावा ? याविषयी संभ्रम निर्माण होणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील सध्या कार्यरत असलेल्या ऍलोपॅथी, आयुर्वेदिक, युनानी व होमिओपॅथी या विविध पॅथीचा अभ्यासक्रम वेगवेगळा आहे. त्यांची तत्वे वेगवेगळी आहेत,त्यांच्या उपचारपद्धती वेगवेगळ्या आहेत. त्यांचा अभ्यासक्रम त्यांच्या ठरलेल्या कालावधीत त्याचप्रमाणे शिकवला जातो. त्यामुळे तेथून प्रशिक्षित होऊन निघणारा



डॉक्टर हा त्या पॅथीचा तज्ज्ञ निष्णात डॉक्टर असतो. अशा वेगळ्या पॅथीच्या डॉक्टर्सला केवळ एक वर्षाच्या ब्रिज कोर्स द्वारे दुसऱ्या पॅथीचे शिक्षण देऊन त्याचा इलाज जनतेवर करून घेणे हा अघोरी उपाय आहे. त्यामुळे जनतेच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असलेला निर्णय घेऊन सरकारने या विषयी आपल्या शासन निर्णयाचे पुनर्विलोकन करावे ही मागणी घेऊन इंडियन मेडिकल असोसिएशनने दिनांक रोजी शासनाला संपूर्ण महाराष्ट्रात मधून २३० शाखांमधून एक निषेध निवेदन दिले होते. त्यामध्ये वरील सर्व बाबी प्रभावीरीत्या मांडल्या होत्या. या सर्व बाबींचा सकारात्मक पद्धतीने विचार करून राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांनी सकारात्मक व योग्य पाऊल उचलत इतर पॅथीच्या डॉक्टरची दुसऱ्या पॅथीचे डॉक्टर्स मध्ये सर मिसळ करणे व त्यांची नोंदणी इतरत्र करणे ही चूकचूक मान्य केली व याचे पुनर्विलोकन करण्यात यावे यासाठी आवश्यक वैद्यकीय सचिव शिक्षण विभाग यांना अवगत करत दिनांक १० जुलै रोजी तातडीची आपत्कालीन बैठक बोलावली. आयएमए डॉक्टरांचे म्हणणे बरोबर आहे व हा निर्णय मागे घेण्यात येईल असे सुतोवाच माननीय मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांनी यावेळी आंदोलनकर्त्या डॉक्टरांना दिला. याबाबत सरकारकडून लगोलग अधिकृत निवेदन जारी करण्यात आले अशी माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सरकारने आपल्या निर्णयाचे पुनर्विलोकन करून विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित व सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी संबंधित हा निर्णय घेतला याबाबत महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.संतोष कदम, सचिव डॉ.अनिल आव्हाड, मंगेश गुलवडे, डॉ.शिवकुमार उत्तुरे, डॉ.जयेश लेले, डॉ.रामकृष्ण लोंढे डॉ.संतोष कुलकर्णी डॉ.नवरंगे सर, डॉ.राजीव जेथलिया, डॉ.राजेंद्र कुलकर्णी, डॉ.संजय पाटील, डॉ.संजय कदम, डॉ.संतोष खडतरे, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.राजेश इंगोले व इतर राज्य पदाधिकाऱ्यांनी राज्य सरकारचे व माननीय मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले.

# साहित्य-संस्कृती





## निसर्गभान



# अंगे भिजली जलधारांनी

वर्षभरापूर्वी भेटले होते...तेव्हा नंतर क्वचितच कधीतरी कुठेतरी ओझरती भेट झाली होती. ती भेटीची आस आता पूर्ण होत आहे... ग्रीष्म तापाने पोळलेल्या वसुंधरेशी आता ढगांनी संवाद साधला आहे. त्यांच्या गप्पांची मैफल चार दिवसांपासून अविरत सुरू आहे. सूर्याला ढगांनी लपवले आहे. अधूनमधून थोडी उसंत घेत रिमझिम सरी वसुंधरेला चिंब करताहेत्. पाना-पानांवर पावसाच्या थेंबांनी नक्षी रेखली आहे. वरच्या पानांमधून खालच्या पानांवर आणि आणखी खाली... असे पानांवर उड्या मारत पावसाचे थेंब वसुंधरेच्या कुशीत शिरले. वृक्षवेली जलधारांनी चिंब भिजल्या अन् वृक्षवेलींचे प्रत्येक पान-फुल स्वच्छ तकतकीत झाले. चराचरातील सारी मरगळ दूर पळाली आणि आता चैतन्याने सारा आसमंत सळसळला आहे.

कसं असतं ना या वृक्षवल्लींच? उन्ह तापले असताना आपण लहान झाडांची काळजी वाटते म्हणून सगळ्या कुंड्या सावलीत हलवतो, सकाळ-संध्याकाळ बागेत पाणी टाकतो, झाडांवर फवाऱ्यासारखं पाणी उडवतो. पाण्याची कमतरता झाडांना भासू नये म्हणून किती धडपड केली तरी ही झाडंझुडुपं तरारलेली दिसली नाहीत. पण, हा पाऊस आला आणि बागेतल्या प्रत्येक झाडाने आपला नूरच बदलला. आसमंतातील प्रत्येक झाडाने आपली वेगळी कहाणी सांगायला सुरुवात केली. आदित्यराजाच्या झळा झेलत आपली पावित्र्याची शुभ्र झळाळी मोगऱ्याने टिकवून ठेवली होती. रात्री चंद्रप्रकाशाचे कण पिऊन मोगरा उन्हाळ्यातही सुगंधाची उधळण करीत होता. आता त्याने आपला धवल सुगंधी वसा जाईजुईकडे सोपवला. पावसाने जाईजुईंना चिंब भिजवले आणि दोन दिवसांत वेली प्रसवल्या. अंगोपांगी इवल्या-इवल्या कळ्यांना गोंजारू लागल्या. तिन्हीसांजेला वेलींवर शुभ्र चांदणे फुलले आणि माझा आसमंत गंधाळला...

**थेंब थेंब नभातून सरसर उतरले**
**माझ्या जाईजुईंना घट्ट मिठीत घेतले**
**जाईजुई शहारली वर्षभरानं भेटले**
**अंगोपांगी थरारली, विसरली ग्रीष्मझळे**
**पानापानांना चुंबून थेंब मग सटकले**
**ती गेली नव्हाळून, सर मोत्यांचे घातले**
**जाईजुई प्रसवली, तनमन मोहरले**
**कळी-फुले इवली, फांदी फांदीवर झुले**
**गंधभारलेली कथा वारा सुखावून सांगे**
**सृजनाचा आविष्कार, चराचर सुखावले**

पावसाच्या एका सरीची सारी किमया आहे. एक सर चराचरात प्राण ओतते आणि सूर्यतापाने पोळलेल्या सृष्टीचे चैतन्य परत येते. मधुकामिनीच्या झाडांची गंमत वाटते. कोणत्याही ऋतूमध्ये बऱ्याच दिवसांनी जेव्हा पावसाची एक सर येते, हे झाड लगेच कळ्यांनी बहरते. हिरव्यागार गुळगुळीत लांबुळक्या पानांमधून दोन दिवसांत पाच पाकळ्यांच्या पांढऱ्या दुधाळ फुलांचे गुच्छ रात्री आपला सुगंध वाऱ्याबरोबर सर्वत्र धाडतात. सकाळी फुलं दिसतात, पण हात लावताच गंधभारलेल्या पाकळ्या गळायला सुरुवात होते. अनंताच्या फुलांचेही तसेच काहीसे असते. बऱ्याच दिवसांनी पडलेल्या पावसाच्या सरी या झाडांना इतक्या सुखावतात की, तो आनंद साऱ्या आसमंतात सोबत लुटण्यासाठी ही झाडं बहरतात, फुलतात आणि आसमंतात गंध उधळतात. चंद्रोदयाच्या वेळी चंद्राची शीतलता पिऊन तीच झळाळी ल्यायलेले अनेक चंद्र घनदाट जाडसर गडद हिरव्या पानांमध्ये उमलतात. शुभ्र पाकळ्या फेर धरून अंगण गंधाळतात.

तिन्हीसांजेला चमचमत्या तारकांचा ताफा घेऊन रजनीनाथ हलकी पावलं टाकत नभात अवतरतात. घरोघरी देवापुढे सांजवात लावतात. अशा वेळी आपल्या अंगणातही सुखद सुगंधाची बरसात प्राजक्त करतो.

**झाली तिन्हीसांज, देवा सांजवात**
**उगवती नभात चांदण्या अनंत**
**तो प्रकाश शीत, त्यात धरा न्हात**
**गार वायूलहरी, गंध स्वार त्यावरी**
**मंद-धुंद-गंध, दरवळतो आसमंत**
**झाडावर फुलती तारका अगणित**
**मोहक, सुगंधित तारकांचा संग**
**करीत प्रफुल्लित, पुलकित सर्वांग**
**आज अंगणात फुलला पारिजात**
**फुलवितो वसंत मन गाभाऱ्यात**

सत्यभामा आणि रुक्मिणी यांचं श्रीकृष्णावर प्रेम, पण श्रीकृष्णाची कुणावर अधिक प्रीती? श्रीकृष्णाच्या या दोन पट्टराण्यांमधील हे लडिवाळ भांडण कविवर्य ग. दि. माडगूळकर यांच्या 'फुले का पडती शेजारी?' या गाण्यामुळे मराठी मनामनात

● वृंदा जोगळेकर
९४२२११३९४१

पोहोचलं आहे. या गाण्यातला पारिजातक जाईजुई, अनंत, मधुकामिनी यांच्यासोबत बहरतो. केशराच्या नाजूक देठावर सहा पांढऱ्या पाकळ्यांची फुलं फुलतात. खरखरीत फांद्यांवर खरखरीत काळसर हिरव्या कतरत्या पानांमध्ये फुलणारी ही केवढी नाजूक फुलं! प्राजक्त रात्री फुलतो आणि वाऱ्याच्या झुळकीसोबत फुलं धरेकडे झेपावतात. झाडाखाली हिरव्याकंच गवताच्या गालिच्यावर पडलेले हे सुगंधी चांदण्यांचे मनमोहक सडे! माझ्या अंगणात हा पारिजातकाचा सुगंधी सडा का नसावा बरे? सत्याभामेने ही लाडिक पृच्छा करणं म्हणजे काही फार मोठी चूक केलीय्, असं वाटत नाही.

याशिवाय या आषाढसरीत न्हाऊन गर्द हिरव्या पानांमधून चाफ्याचे गुच्छ भेटतात. दुधाळ रंगाच्या फुलांचे गुच्छ रानजाई सर्वांगावर मिरवते. मोगऱ्याच्या शुभ्र सुगंधाचा वसा वृक्ष-लता पावसाच्या सरींसोबत पूर्णत्वास नेतात.

**चांदणे नभातले, नक्षत्र भूमंडले**
**भूवरी उतरले, नक्षीदार रेखले**
**हरित पर्णातले, सुगंधाचे बुधले**
**सुमनांनी ओतले, समीराने वाहिले**
**आसमंत गंधले, तन हे मोहरले**
**उमलती शुभ्र फुले, मनही चांदणले...** ●●

## मन्याच्या काव्या

# नवरीची धूम 'येन्ट्री'!

वंदुच्या लग्नाचं ठरलं एकदाचं. चार वर्ष तिले 'हो' म्हणालेच लागले. वयाची पस्तीशी झाली अन वंदुले लग्न करावसं वाटलं. तिच्यासोबतच्या मैत्रिणी कवाच्याच नवायाकडे गेल्या होत्या. वंदु कवाचीच मावशी बी झाली होती. तिच्या जिगरीजान मैत्रिणीचं मंदीचं लग्न नागपुरात झाले होते अन वंदु चार दिवस लग्नसोहळा बघून आली होती. तिथला तो धांगडधिंगा वंदुले लय आवडला होता. आता गावात पण असच आपलं लग्न झालं पायजे, हा तिचा अट्टाहास होता. 'फुल एन्जॉय' हा विषय तिच्याबी डोक्यात भरला होता. शेजारच्या ससेगावचा डेकोरेशनचं काम करणारा नंद्या जाधवशी तिची सोयरीक जुळली होती. नंद्या होता बरा दिसायले. राजकारणात ॲक्टीव होता. डेकोरेशनची डिग्री नसते म्हने नायतर याच्यातच पीएचडी करण्याचा त्याचा विचार होता. साखरपुडा मोठ्या दिमाखात पार पडला.

वेशीवरच्या गणपती मंदिरात दोघबी दर्शनाले गेले होते अन राजारामच्या ठेल्यावरतं पानीपुरी बी खाऊन आले होते. नंतर लग्नाचा बस्ता घ्याले दोघबी नागपुरात आले होते, तवा 'सावजी'मध्ये मस्त हाणून आले होते. लग्नासाठी नागपुरातलेच गुरुजी ठरवले होते. ''विवाह मुहुर्तावर होईल, सांगून ठेवा दोघांना...काय यजमान'' असे गुरुजी म्हणाले अन् यावर मुलीचा मामा म्हने, ''काय बी कायजी करू नका गुरुजी, टाईम टु टाईम होईन समदं...'' एकदाची लग्नाची तारीख ठरली. 'लगीन गाठ' नावाचं नवीन मंगल कार्यालय ठरलं, अन् एकदाचा तो दिवस आला.

हल्ली विवाहाच्या आदल्या दिवशीची गळाभेट बंद झाली आहे आणि थेट 'डांस' सुरू झाले आहे. त्याच्यात 'बायपास झालेले', 'हाड मोडमाड झालेले', 'वातानं पछाडलेले' असे सगळे उत्साही नाचत असतात. गुरुजी पन मग 'शॉर्टकट' मारून डान्स बघत बसले असतात. भारतात जन्म घेणे म्हणजे जन्मजात 'ॲक्टर' असणे असेच या सगळ्यांच्या नाचण्याच्या हावभावावरून सहज वाटून जाते. इकडे गावात पन तसच झालं. वंदु व नंदु ''तू मेरी मैना, मै तेरा तोता'' या गाण्यावर धुम नाचले तवा बम्म शिट्या पडल्या. मग दोघी सासु-सासु ''आ देखे जरा किसमे कितना है दम'' या गाण्यावर अशा थिरकल्या का दोघाईचे नवरे बी स्टेजवर चढले अन् धोतर सांभाळत नाचले. दोघानंबी आपापल्या 'ईहीन बाई' सांभाळल्या.

दुसरा दिवस महत्त्वाचा होता. नंद्याले घोडा नाय आवडे. त्याचा दोस्त घोड्यावरून पडला होता अन् समोरचे दोन दातच तुटले होते. फोटोमंधी 'रामसे'च्या भयानक कॅरेक्टरवानी तो वाटे. म्हणून मंग नामदेव मामाची कार घेतली अन हनुमानाले पोहोचला. ओलं नारळ काही केल्या त्याच्याकडून फुटेना. मग नव्वद वर्षांच्या जनकबुढ्यानं

रपरप बुच्या
काढून नारळ फोडलं. वापस कार्यालयात आले.
आता चिंगाया साळीले मोठा चेव आला. ''जिज्जाजी, पयले दोन हजार काढा मंगच ताईले दाखवू'' असा प्रस्ताव ठेवला. घासाघिसी करत मंग दोनशेवर एक रुपया अशी तडजोड झाली अन् नवरा बोहल्यावर चढला. इकडे समदे वंदुची वाट बघून रायले होते. लोकं आपापसात चर्चा करू लागले होते. ''एवढा वेळ कायले लागते पोरीले'', ''आजकालच्या पोरी हाय भौ, काय बी टाईमचं महत्त्व नाय...'' मुलीचा मामा तर पार भडकून गेला. ''आज येईन का नाय पोरगी... गुरुजीले मी म्हंन्ल होतं टाईम टु टाईम होईन म्हणून...माया इज्जतीचा करता का भाजीपाला...'' वंदुचा भाऊ अशोक मामाले धीर देत होता. ''मामा, खास येन्ट्री हाय नवरीची...'' इकडे गुरुजी नाकावरचा चष्मा काढत जाये, पुसत जाय अन पुन्हा नाकावरतं ठेवत जाय. हातातल्या अक्षदा ओल्या होऊन हातातच भात होते का कां, इतका टाईम केला वंदूनं. तितक्यात फटाक्यामधलं अनार झाड दोनी बाजूले ठेवण्यात आले. त्याचा कारंज्यासारखा प्रकाश पडला.

● मनोज वैद्य
९८२२९४९२६०

दुरून चार पोरी मटकत मटकत हातात रेशम वस्त्र पोरीच्या डोक्यावरत धरून हळूहळू येत होत्या. रत्ना ब्युटी पार्लरवालीनं वंदूचं रूपचं बदलवून ठेवलं होतं. ''बहारो फुल बरसाओ मेरा मेहबुब आया है'' या गाण्यावर वंदू हळूहळू पावलं टाकत येत होती. अन मंग अचानक ''झिंग झिंग झिंगाट' गाणं वाजलं अन वंदू तुफान नाचालेच लागली. तिनं नवायाले नंदूले बी खालतं खिचलं अन तो बी कसाबसा बुड हालवू लागला. इकडे मामा अन गुरुजी ''लाल'' होत होते. पण वंदूचा डान्स काय खतमच होत नव्हता. ''नवऱ्याले नाचवते पोरगी पाय रमाबाई'' अशा बायका कुजबुजू लागल्या. शेवटी मुलीच्या मामानं साऊंडवाल्याच्या कानाखाली लावली अन गाणं संपलं अन मंग इकडे लग्न ''सावधान'' म्हणून पार पडलं.

अहेर म्हनून अनेकांनी गुंड, तावा, भांडे आणले होते. एका कडेवर पोरगं अन एका कडेवर गुंड सांभाळत बायका उभ्या होत्या. फोटोवाला झोपू झोपू फोटो काढे अन वंदू मोठं तोंड करून दात काढे. इकडे लोकं कटायले. आता लोकाईले केव्हा अहेर देतो अन बफे मंधी घुसतो असं झालं होतं,

पण वंदू-नंदूले फोटोग्राफरनं केव्हा पळवून नेलं कळलच नाही. त्यानं छतावरतं नेऊन आडवे तिडवे फोटो काढले. इकडे मुलाचा मामा बॅग घेऊन बायकोले म्हने ''चाल वं, हे असं आमी पायलं नाय आमच्या जिंदगीत...'' असं म्हणून जायले लागला. मुलीकडचे मनवू लागले. कोणीतरी मेसेज वंदूले पाठवला अन मंग दोघं बी स्टेजवरतं आले. लग्न लोकाईनं लावलं अन मस्त बफे झोडला. मंग आठवडाभर गावात जो तो 'नवरीच्या खास येन्ट्री 'ची चर्चा करत होता. ●●

## गावगाडा

# विविधतेने नटलेली वैदर्भीय खवय्येगिरी



विदर्भातील खाद्य संस्कृती खरंच खूप चविष्ट आहे. झणझणीत, चमचमीत आणि ठसकेबाज या वैशिष्ट्यांनी भरलेल्या अस्सल वैदर्भीय पदार्थांना जगात तोड नाहीच.

पूर्व विदर्भातून सुरुवात केल्यास, धान पिकाने समृद्ध असलेला हा प्रसिद्ध भूभाग. उत्तम दर्जाचा तांदूळ या भागात पिकतो. त्यामुळे विशेषतः तांदूळजन्य पदार्थांची येथे रेलचेल असते. अतिशय चवदार लागणाऱ्या तांदळाच्या हातावरच्या चकल्या फक्त पूर्व विदर्भातच खायला मिळतील. नागपूर, चंद्रपूरचा चविष्ट असा तर्री पोहा. खवय्यांच्या दिवसाची सुरुवातच या तर्री पोह्याने होते. पोह्यावर टाकलेला गरमागरम चणा रस्सा, तर्री, टमाट्याची फोड आणि थोडासा चिवडा अहाहाहाSS खरंच अप्रतिम चव... पावसाच्या झडीत, गुलाबी थंडीत वाफाळलेल्या चहासोबत तर्री पोह्याची मजा काही औरच! याशिवाय इथल्या कच्च्या चिवड्याची चव कुठल्याही ब्रॅण्डेड फरसाणलाही येणार नाही इतकी अप्रतिम आहे. पूर्व विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांत कच्चा चिवडा हा पदार्थ आढळतो. नागपूरचा कढी-सामोसासुद्धा खूप प्रसिद्ध आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत पूर्व विदर्भातील साधारणतः ग्रामीण भागात ज्वारीच्या कण्या अन् आंबील घरोघरी असतेच. भाताचा प्रदेश असल्याने पंगतीच्या जेवणात व दैनंदिन आहारात भाताचा समावेश असतो. रात्रीच्या वेळी गोळा-भात, सणासुदीला भजा-भात आणि वडा-भात. पुरणपोळी तर संपूर्ण विदर्भात आहेच.

पश्चिम विदर्भाकडे वळल्यास स्ट्रीट फुडच्या दुनियेत अमरावतीचा गिल्ला वडा खरंच लाजवाब! अकोल्याची पाणीपुरी, अकोला म्हणजे पाणीपुरीची राजधानीच. इथल्या पाणीपुरीची चव जगात अन्यत्र कुठेही मिळणार नाही. पंगतीच्या जेवणासाठी धगधगत्या निखाऱ्यावर भाजलेले रोडगे, बिट्ट्या आणि वांगे बटाट्याची रस्सा भाजी व तुरीचे साधे वरण. 'रावण पिठलं' नावाचाही एक प्रकार अकोला, वाशीम जिल्ह्यात आहे. अतिशय झणझणीत म्हणजे अगदी कानातून जाळ काढणारा हा पदार्थ. याची रेसिपी सांगायची झाल्यास हे पिठलं करताना जेवढे बेसन घेतले जाते, तेवढेच तिखट घ्यायचे. म्हणजे कल्पना करा किती तिखट होत असेल हे 'रावण पिठलं'! म्हणूनच याला 'रावण पिठलं' हे नाव अतिशय समर्पक आहे. ज्वारीची भाकरी आणी उडदाच्या डाळीचे खमंग वरण वऱ्हाडी जेवणाची रंगत वाढवते.

● अखिल देशपांडे
९७६७१५१८३०

बुलढाणा जिल्ह्याकडे वळल्यास पंगतीच्या जेवणात मिरचीची रस्सेदार भाजी आठवते. स्ट्रीट फुडच्या दुनियेत शेगांवची कचोरी तर संपूर्ण राज्यात प्रसिद्ध आहे. इतक्या साऱ्या चमचमीत आणि झणझणीत पदार्थांनंतर मग मात्र नांदुऱ्याच्या प्रसिद्ध, दर्जेदार खव्याची आठवण येते. अनेक हॉटेल उद्योगात मिठाईसाठी येथील खव्याला विशेष मागणी आहे. विविधतेने नटलेली ही वैदर्भीय खाद्य संस्कृती म्हणजे आमची शान आहे आणि या पदार्थांमुळेच आमची खवय्येगिरीसुद्धा टिकून आहे. ●●

## स्पंदन

# 'रुको जरा... सबर करो'

रुको जरा... सबर करो... हे हिंदुस्थानी भाऊचे वाक्य सोशल नेटवर्किंग साईटवर धुमाकूळ घालत असते. तसेच जॉनी लिव्हरचे वाक्य... अभि मजा आयेगा न भिड़ू... वरचेवर ऐकायला येत असते. या दोन्ही वाक्यात जसा गहन अर्थ दडलेला आहे, त्याचप्रमाणे खिचायी वाला अर्थ पण लपलेला आहे. म्हटले तर गांभीर्य, नाही तर टांग ओढणे, असे दोन्ही भाव या वाक्यातून ध्वनीत होतात.

साईबाबा म्हणतात...श्रद्धा आणि सबुरी... म्हणजे धीर. आपल्या जीवन मूल्यात पण मनुष्याने धीर ठेवावा, अधीर होऊ नये, संयम बाळगावा...असे सांगितले आहे. 'जल्दी का काम शैतान का होता है' असे जे म्हटले जाते, ते सबरचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. 'सब्र का फल मिठा होता है', हे आपण जाणतोच. आज बीज रोवले की उद्या फळ येणार नसते. बाळ जन्माला येते ते धीराची परीक्षा पार करूनच. अर्थात्, आईच्या धीराची ती परीक्षा असते. 'रुको जरा... सबर करो' असे निसर्ग पावलोपावली सांगत असतो. जीवनात यश मिळविण्यासाठी धीराची कास धरावीच लागत असते. आयुष्यात धरसोडपणा उपयोगाचा

● आशिष देव
७७४१८१८४१८

नसतो. साधा भात शिजवायचा असेल तरी धीर ठेवावा लागत असतो. अधीरतेमुळे भात कच्चा राहून जातं असतो... निसर्गाचे सातत्याने फिरणारे चक्र पण धीराचा संदेश देऊन जात असते.

...'अभि मजा आयेगा न भिड़ू' असे सकारात्मक पद्धतीने पण म्हणता येते आणि कुणाची मौज घेण्याच्या उद्देशाने पण! एखादा आगाऊपणा करीत असेल आणि त्याची फजिती होणार, हे निश्चित असेल तर... 'अभि मजा आयेगा न भिड़ू' हे उच्चारल्या गेलेले वाक्य पुढे होणाऱ्या घटनेची कल्पना देऊन जात असते... वाचकाला वाटत असेल, हा लेख संपेल तरी कधी त्यावर मी इतकेच म्हणेल... 'रुको जरा... सबर करो...' आणि लेख फसणार आहे आणि माझी पो-पो होणार आहे, असे वाचकाला वाटत असेल, तर ते मनातल्या मनातं नक्की म्हणत असतील...'अभि मजा आयेगा न भिड़ू...' ●●

# समांतर चित्रपट गीतांचे लक्षणीय निरूपण

स्नेहांकित चंद्रपूर आणि वि. सा. संघ गोंडवन शाखेतर्फे शनिवार, २८ जून रोजी ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील गाणी, संगीत हा वेगळा विषय घेऊन सादर केलेला कार्यक्रम उपस्थितांना आनंद देऊन गेला. श्यामबाबू हे समांतर चित्रपटाचे प्रणेतेच. समांतर चित्रपटाचे संगीत, त्यातली गाणी तशी दुय्यमच. मात्र, आज या कार्यक्रमात बेनेगलांच्या सिनेमातील गीत संगीतातील सौंदर्यस्थळं शोधत, अनहर्ड पैलू सांगत नागपूर येथील सिने अभ्यासक, मुलाखतकार अजेय गंपावार यांनी वातावरण निर्मिती केली. श्याम बेनेगल यांचे दिग्दर्शकीय कौशल्य, संगीतकार वनराज भाटीया यांचे संगीतकार म्हणून श्रेष्ठत्व अधोरेखित करीत गंपावार यांनी रसिकमनाचा ताबा घेतला व त्यांना मंत्रमुग्ध केले.

'भारत एक खोज'पासून झालेली सुरुवात 'नॉस्टेलजिक' करून गेली. 'सृष्टी से पहले सत नही था...' हे वनराजजींचे 'टायटल साँग' दूरदर्शनच्या काळात घेवून गेले. अंकुर, निशांत, मंथन, भूमिका, जुनून, मंडी, कलयुग, त्रिकाल, सूरज का सातवा घोडा, मम्मो, सरदारी बेगम, मेकिंग ऑफ महात्मा या चित्रपटातील गाणी पडद्यावर दाखवत गंपावार यांनी केलेले निरूपण... निव्वळ अप्रतिमच. त्रिकाल आणि मेकिंग ऑफ महात्मा या दोन सिनेमांचा अपवाद वगळता मी बेनेगलांचे सर्वच सिनेमे बघितलेत, वेश्याव्यवसायावर अनेक सिनेमे आलेत, पण मंडी इतका श्रेष्ठ सिनेमा मला आठवत नाही. वेश्याचं भावविश्व, त्यांचे प्रश्न सजीवपणे श्याम बेनेगल यांनी मांडले आहेत. त्यातलं सुरेख गीत दाखवताना अजेय यांनी शबाना आणि स्मिता या श्रेष्ठ कलावतींना एका फ्रेममध्ये दाखवून दिलेल्या आनंदाबद्दल मनःपूर्वक आभार. 'मेरे कान्हा जो आये पलट के' ही ठुमरी आणि सरदारी बेगमबद्दल अजेय यांनी दिलेली माहिती तर 'सुपर्ब'. आशा भोसले, आरती अंकलीकर यांच्या आवाजातल्या ठुमरी हे सरदारी बेगमचे शक्ती स्थळ. श्याम बेनेगल आणि वनराज भाटिया या जोडीचा सरदारी बेगम हा शेवटचा चित्रपट, पुन्हा या दोघांनी एकत्र काम केलं नाही. असा माहितीचा सुरेख पट अजेय यांनी रसिकांसमोर मांडला. त्रिकालची कथा १९६० च्या काळातली. जेव्हा गोवा मुक्त झाला, त्यावेळी वीज नव्हती. तो परिणाम साधण्यासाठी मेणबत्तीच्या प्रकाशात चित्रीकरण करण्यात आल्याची मौलिक माहिती माझ्यासारख्या रंगकर्मीच्या ज्ञानात भर घालती झाली. ते ऐकताना अशोक मेहता यांच्या विषयीचा आदर दुणावला. मेकिंग ऑफ महात्मा हा म. गांधी यांच्यावरील चित्रपटाचा वेध सुरेखच. वंदे मातरमच्या जयघोषाच्या सुरेल व सुरेख नोटवर कार्यक्रमाची सांगता झाली हे विशेष. ●●



● अजय धवने
९८२२५६५९२६



# जंगलाचा अदृश्य नायक!

ताडोबा अभयारण्यातली दुपारची ट्रेल सुरू झाली. सकाळच्या फेरीत आत प्रवेश केल्याबरोबर एक महाकाय गवा रस्त्याच्या बाजूलाच गवताचा नाश्ता करीत होता. त्याचा प्रचंड आकार, मोजे घातल्यासारखे पांढरे पाय, बाकदार शींग सारं काही दृष्ट लागण्यालायक. या प्रचंड शक्तिशाली जनावराची क्वचित प्रसंगी शिकार करणारा वाघ म्हणूनच आदरणीय.

त्याचा दबदबा या पूर्ण भूमीवर जाणवतो. या अभयारण्यातील जनावरे गाड्यांना इतकी माणसाळली आहेत की, त्यांना तुमची भीती वाटत नाही. 'दे जस्ट इग्नोर यू'... तुम्ही थांबा, पाहा, फोटो काढा...आणि जा. प्रकल्पातील कोळसा गावाच्या आजूबाजूला आमची गाडी फिरत होती. लाल मातीवर गाडी सावकाश केली व खाली नजर टाकली. वाघाच्या पाऊल खुणा स्पष्टपणे सर्व मार्गावर दिसत होत्या. या खुणांच्या आधारे आम्ही बराच तपास केला. पण ही काही सीरियलमधली सी.आय.डी. नाही, वाघ सापडायला. वाघ मनात आलं की, केव्हाही आपला रस्ता बदलून निघून जातो. वाघाच्या दर्शनाची धुंदी गाडीत भरून वाहत असते. दोन दिवसांपूर्वी पावसाने हजेरी लावली होती. रानवारा छान मोठे मोठे श्वास घेऊन मी भरून घेत होतो. पगमार्कच्या रूपाने वाघाच्या अस्तित्वाच्या खुणा सगळीकडे दिसत होत्या. पण, जसा सकाळी दिसला नाही तसेच आताही होत होते. जंगल तुमची परीक्षा घेते.

वाघासाठी दरवेळेला तोच उत्साह अंगात संचारतो. किती वाघ पाहता हो? या प्रश्नाला काही उत्तर नसते. जंगली कोंबडे सकाळपासूनच सोबत करीत होते. मोराचा पिसारा व त्यांची गर्द निळसर जांभळी मान, त्यावरील तुरा अक्षरशः वेड लावतो. या पक्ष्याची एक वेगळीच ऐट आहे. पक्ष्यांची आवड असेल तर जंगलात काहीच कमी पडत नाही. प्राण्यांना सगळं ज्ञान पिढीजात. हेच त्यांना आपल्याला सांगायचं असावं. निसर्गाला जर गुरू मानलं, त्याचं छान अवलोकन केलं तर आपल्या कित्येक समस्यांची सहज उकल करता येईल. माकडांचा तर फारच हेवा वाटतो. सगळं काही हर्बल. माकडांची विष्ठा जवळपास गंधरहीतच असते. माकडाच्या पिलांचे खेळणं आणि बॅलन्सिंग मला रंगवून टाकतं. पक्ष्यांतील उडण्यातली सहजता आवडून जाते. झाडांचे वेगवेगळे आकार एकमेकांना दिलेला आधार खूप काही शिकवून जाते. जंगल म्हणजे सहजीवन, तेही सहज. या यादीला सीमा नाही.

एवढ्यात समोरची गाडी थांबली होती. थांबणे म्हणजे एक चांगलं लक्षण. आम्ही तिच्यासोबत थांबल्यावर एक बिबट बांबूच्या आत बसून होता. वाघ किंवा बिबट दिसल्यावर गाडीत गडबड झाल्याशिवाय राहत नाही. आवाजाने बिबट्याला विचलित केले असावे. तो आत निघून गेला. वन्यजीव आपल्या मनाचे राजे असतात. त्यांना तुमच्याशी काही घेणंदेणं नसतं. या अल्प दर्शनाने भारून आम्ही पुढे निघालो. कारण, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. नाराज होऊ नका, ही फक्त झलक होती. पिक्चर तो अभी बाकी है... सायंकाळचे पाच वाजले होते, वन्यप्राण्यांनी आळस झटकला होता. एक उत्साह सगळीकडे जाणवू लागला. अचानक समोर चार जिप्सी गाड्या रस्त्यावर जवळजवळ थांबल्या होत्या. गाडीतील सर्व जण उभे होते. काही सांगायची आवश्यकता नव्हती. आपोआप गाडी वेगाने जाऊ लागली. समोरील गाडीवाल्यांनी इशारे देऊन गाडी थांबवली. त्यांनी दाखवलेल्या ठिकाणी नजर गेली. एक मस्त पूर्ण वाढ झालेला बिबट्या समोरील पाय उभे करून बूड टेकवून बसला होता. फक्त पंधरा-वीस मीटर अंतरावर. तेही स्पष्टपणे दिसेल अशा ठिकाणी तो होता. त्याला काही घाई नव्हती. पायाचे पंजे साफ करणे छान सुरू होते. आपल्याच थाटात तो चालत रोडवर आला. चेहरा त्याने थोडा फीसकारला, पण तो शांतच होता. वाघाप्रमाणे रोडवर येऊन त्याने चक्क रस्त्याच्या मधोमध बैठक मारली. थोड्याच वेळात गाड्यांची संख्या वाढली. मनसोक्त बिबट पाहण्याचा आनंद सर्व पर्यटकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. अचानक त्याच्या मनाप्रमाणे तो उठला व सावकाश चालत जंगलात गेला. जंगलाचा एक अदृश्य नायक, चिमुकल्या जीवांचा कर्दनकाळ एक उमदा शिकारी नजरेआड गेला. उत्तम प्रकारे बिबट पाहण्याचे माझे स्वप्न साकार करून गेला. ताडोबा पर्यटकाला कधीच नाराज करीत नाही, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले! ●●

● बाबा देशपांडे
९४२३६१३२२६

## झुळूक



# फिरकी

अण्णा तसे मूळातच दयाळू! रस्त्यावर बसलेल्या भिकाऱ्याला एखादं नाणं अवश्य देत. पण, त्या दिवशी मॉर्निंग वॉकला जाताना कोपऱ्यावर एक नवा फारच प्रोफेशनल आणि हाय-टेक भिकारी भेटला... काठी टेकत जाणारे अण्णा थबकले... अण्णांना बघून भिकाऱ्याला अवसान आलं...

''साहेब एक रुपया द्या की हो गरिबाला''!

अण्णांनी खिशात हात घालून थोडी चाचपणी केली...पण खरंच खिशात पैसे नव्हते!

''सॉरी... पण तुला द्यायला आज काही नाही रे''!

''चिल्लर नाही काय? मग मी चेंज देतो की''

''छे छे, तसं नाही रे बाबा, खिशात पैसेच नाही आणलेय् मी''! इति अण्णा.

''तर मग डोन्ट वरी, माझ्याकडून कर्जाऊ घ्या... फक्त दहा टक्के व्याजाने''! भिकारी दात विचकत बोलला.

''छे छे...मी कशाला कर्ज घेऊ? आणि तेही तुझ्याकडून? काहीतरीच काय बोलतोयस''!

''तर मग, द्या की साहेब एक रुपया लवकर! खिशात कार्ड असेल तर स्वॅप करा स्वॅपमशीन आहे माझ्याकडे.'' भिकारी फारच चिवट होता.

''छे छे कार्ड नाही माझ्याजवळ, मॉर्निंग वॉकला जाताना कुणी कार्ड ठेवतो होय''?

''कॅश नाही, कार्ड नाही... ही तुमची चूक आहे साहेब, तुम्ही माझं गरीबाच कशाला उगाच नुकसान करताय''?

''आज नाहीये.....उद्या देईल''!

''ठीक आहे, तर मग माझी तुमच्याकडे ही उधारी आहे असं समजा''!

''छे छे, मी कधीच उधारी करीत नसतो, बरं का! कमाल आहे... एका क्षणात तू मला तुझा देणेकरी बनवलंस की काय? कुठल्या गाफील क्षणी आज सकाळी सकाळी तुझ्याशी बोलायला लागलो, देव जाणे हा..हा..हा...बरं ते जाऊ दे. मोठा हुशार दिसतोस रे तर मग मला सांग, तू भिकारी कसा काय झालास?''

''या अशाच... उधारी मुळे''! ''म्हणजे समजलो नाही मी''?

''तुमच्यासारख्या अनेकांची उधारी अजून येणे बाकी आहे... उद्या देतो म्हणून पुन्हा कधी आलेच नाही... अशी ही उधारीची परतफेड न झाल्याने मी दिवाळखोर झालो बघा! बोला साहेब, कसं म्हणलं म्या''?

प्रश्नोत्तराचे हे सत्र अधिक पुढे रेटण्यात आता अण्णांना काही अर्थ वाटत नव्हता. सुदैवाने भिकारी अन्यत्र बिझी झाल्याने आता सुटका झाली होती... भल्या पहाटे या पठ्ठ्यानी अण्णांची आज चांगली फिरकी घेतली होती... आता अधिक काही न बोलता...अण्णा काठी टेकत घाईघाईने पुढे चालू लागले. ●●

● मो. बा. देशपांडे-८३२९१९३५४२

● संयोजक - संजय रामगिरवार, ९८८१७१७८३२

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मध्यमवर्गीय मद्यप्रेमींना धक्का : 'लाडकी बहीण' योजनेचा भार आता 'भाऊजीं'च्या खिशावर!

## दरवाढ, तुटवडा आणि दुकाने बंद, वाईन शॉप चालकांचीही कोंडी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.१३ जुलै -**

राज्यात लाडकी बहीण योजनेसाठी निधी उभारण्यासाठी सरकारने मद्य दरात केलेली वाढ सध्या वादाचा विषय ठरत आहे. विशेषतः मध्यमवर्गीय ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्या मद्यप्रकारांवर मोठ्या प्रमाणावर दरवाढ झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. किनवट शहरासह जिल्ह्यात सर्वाधिक मागणी असणारे काही मद्यप्रकार सध्या बाजारातून गायब झाले असून, परिणामी अनेक वाईन शॉप चालकांना आपली दुकाने बंद ठेवावी लागत आहेत.



**दरवाढीचा झटका**

३६५ रुपयांच्या ब्लेंडर या लोकप्रिय ब्रँडच्या दरात केवळ १५ रुपयांची वाढ झाली आहे. ग्रँड मास्तर या २२० रुपयांच्या या ब्रँडवर तर थेट ८० रुपयांनी वाढ झाली आहे. जे मध्यमवर्गीय जास्त रिचवतात. ही दरवाढ इतकी अचानक आणि मोठी आहे की, मध्यमवर्गीय ग्राहकांच्या खिशाला थेट कात्रीच बसली आहे.

**उपलब्धता नाही, ग्राहकांचा रोष**

ज्या मद्याची मागणी जास्त, तेच सध्या दुकाने रिकामी परिणामी ग्राहक संतप्त होत आहेत. काही वाईन शॉप चालकांनी तर ग्राहकांचा रोष सहन न झाल्याने प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. दैनंदिन ३ ते ५ हजार रुपयांची परवाना फी भरूनही जर पुरवठा नसेल, तर व्यवसाय सुरू ठेवणे शक्य नसल्याचे वाईन शॉप चालकांचे म्हणणे आहे.

**परवाना फी व दरवाढीचा दुहेरी फटका**

वार्षिक ७ ते ८ लाख रुपये एवढा परवाना भरूनही, दरवाढीमुळे विक्री ठप्प झाली आहे. या परिस्थितीचा परिणाम २५ जुलैपर्यंत राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**सरकारच्या धोरणावर सवाल**

राज्य सरकारने महागडे विदेशी मद्य दरवाढीपासून वाचवले, मात्र मध्यमवर्गीयांचे आवडते ब्रँड मात्र महाग केले गेले आहेत. या दरवाढीकडे 'लाडकी बहीण योजनेच्या निधीसाठी भाऊजींकडून वसुली सुरू' असे म्हणून नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

**विक्री घट, महसूलही धोक्यात**

सरकारला महसूल वाढवायचा आहे, पण सध्याची घाईघाईची दरवाढ ही ग्राहकांना परवडणारी नाही. त्यामुळे उलट विक्री कमी होत आहे, आणि परिणामी सरकारी तिजोरीलाही फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**दारू दुकान चालकांचे मत**

आम्ही नियमित परवाना फी भरतो, पण आता विक्रीसाठी मद्यच नाही. ग्राहक रागावतात, वाद होतात. शिस्तीत व्यवसाय करणे अशक्य झाले आहे. मद्य दरवाढीचा फटका फक्त ग्राहकांनाच नव्हे तर वाईन शॉप व बिअर बार चालकांनाही बसत आहे. सरकारला निधी उभारण्यासाठी वेगळी व्यवस्था करावी लागेल अन्यथा या निर्णयाचे सामाजिक आणि आर्थिक दुष्परिणाम दूरगामी ठरू शकत आहे.

# कसारपेठ येथील हातभट्टी दारूचा अड्डा उध्वस्त; ७०० लिटर मोह फुलाच्या दारुसह साहित्य नष्ट

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि.१३ जुलै -**

माहूर पोलीस ठाण्यात महिनाभरा आधी रुजू झालेले पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी तालुक्यातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अवैधधंदेवाल्यांच्या विरोधात जोरदार कंबर कसली असून,फ्लॅश आउट मोहीम अंतर्गत त्यांनी माहूर तालुक्यातील मौजे कसारपेठ येथील शेतशिवारातील नाल्यात सुरू असलेल्या एका अवैध हातभट्टी दारूच्या अड्ड्यावर छापा टाकून तो उध्वस्त करत दारू बनविण्याचे फसफसते रसायन नमुनासाठी घेत तब्बल ७०० लिटर मोह फुलाच्या दारू सहित दारू तयार करण्याचे साहित्य जागेवरच नष्ट करून एका विरुद्ध गुन्हा दाखल केल्याची घटना घडली असून, ही कारवाई रविवारी दि.१३ रोजी सकाळी ८ ते ८:३० वाजताच्या दरम्यान करण्यात आली.



नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप,पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्यावतीने जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'आपरेशन फ्लॅश आउट' कार्यक्रमाची पोलिस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर पोलिस ठाणे हद्दीत प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू केली असून,गेल्या महिन्याभरात माहूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विविध ठिकाणच्या अवैध हातभट्टी दारूच्या अड्ड्यावर टाकलेल्या धाडीत अनेक गुन्हे दाखल झाले असून हजारो रुपयांचे दारू बनविण्याचे साहित्यही नष्ट करण्यात आले आहे.


कुठेही कोणत्याही प्रकारची अवैधरित्या दारू विक्री होत असल्यास नागरिकांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा, अथवा पोलिस ठाण्यात माहिती द्यावी! असे आवाहन त्यांनी केले आहे.

सदरील कार्यवाही पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि संदीप अन्येबोईनवाड यांनी केली असून, यावेळी पोना बाबु जाधव, पवन राऊत, सोनसळे, सोनटक्के यांचेसह होमगार्ड उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### एसजीजीएस संस्थेचे प्रा .गुढे यांना आयाआयटी मुंबई -२०२५ चा पुरस्कार

**नवीन नांदेड** -श्री गुरु गोबिंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान संस्था (SGGSIET), नांदेड आणि विद्युत अभियांत्रिकी विभागातील सहाय्यक प्राध्यापक सिद्धांत एम. गुढे यांना भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (खखढ




इेलरू) द्वारा आयोजित 'राष्ट्रीय FOSSEE चा पुरस्कार २०२५' जाहीर करण्यात आला आहे. एसजीजीएस अभियांत्रिकी तंत्रशास्त्र संस्थेचे विद्यमान प्राध्यापक सिद्धांत एम. गुढे यांनी केलेल्या वैज्ञानिक कार्याबद्दल त्यांना दुहेरी गौरवामुळे प्रा. गुढे यांची वैयक्तिक कामगिरी तसेच एसजीजीएस संस्थेचे ओपन सोर्स शिक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील योगदान अधोरेखित झाले आहे. FOSSEE प्रकल्पाबद्दल (Free/Libre and Open Source Software for Education) हा IIT Bombay येथे सुरू असलेला, भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या ICT मिशन अंतर्गत राष्ट्रीय उपक्रम आहे. याचा मुख्य उद्देश शैक्षणिक, संशोधन आणि औद्योगिक क्षेत्रात मुक्त सॉफ्टवेअर (Open Source Tools) वापरण्याला प्रोत्साहन देणे व त्याचा प्रसार करणे आहे. Scilab, Python, eSim, OpenFOM² यासारख्या ओपन सोर्स टूल्सच्या वापरामुळे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा लाभ घेता येतो, तसेच परवडणाऱ्या शिक्षणाची संधी उपलब्ध होते. सदरील महत्वपूर्ण कार्याची दखल घेऊन आयाआयटी मुंबई यांनी प्रा.सिद्धांत एम. गुढे यांना व त्यांच्या स संस्थेला पण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. सदरील पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे संचालक डॉक्टर मनेश कोकरे व येथील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रा.सिद्धांत एम. गुढे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### उमरी शहरात स्कॉलरशिप मिळविण्यात मॉडर्न इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांना यश

**उमरी, दि.१३ जुलै -**

दर वर्षी प्रमाणे ह्या ही वर्षी मॉडर्न इंग्लिश स्कूल चा स्कॉलरशिप च्या परीक्षेचा निकाल अव्वल ठरला आहे. शाळेतील राजराजेश्वर अनंत



उत्तरवार, साई प्रभाकर पटकुटवार आणि गोजिरी बालाजी गोजे ह्या तिन्ही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालेली आहे. त्यांचा आणि त्यांच्या पालकांचा शाळेत सत्कार करण्यात आला. तसेच ८ वी चे ८ आणि ५ वी चे ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उमरी शहारात शिष्यवृत्ती मिळवण्याचा मान फक्त मॉडर्न इंग्लिश स्कूललाच मिळाला आहे ह्याचा आम्हाला अभिमान आहे असे उद्गार शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा संजय कुलकर्णी यांनी काढले तसेच त्यांनी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. ह्या सर्व विद्यार्थ्यांना नितेश सितावार आणि गजानन अहीरे यांनी विशेष मार्गदर्शन केल्या बद्दल त्यांचे ही अभिनंदन करण्यात आले आहे .

### भाई केशवराव धोंडगे यांच्यासारखे नेतृत्व पुन्हा होणे नाही : प्रकाश गिरे पाटील

**नांदेड** - भाई केशवराव धोंडगे यांची १०४ वी जयंती सांस्कृतिक,सामाजिक,वैचारिक उपक्रमाने श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळेमध्ये साजरी करण्यात आली यामध्ये हाळदा येथील श्री शिवाजी प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये भाई केशवराव धोंडगे यांच्या जीवनकार्यावर व्याख्यानमाला आयोजीत करण्यात आली होती यावेळी विचारवंत पी. बी. वाघमारे व अष्टपैलू फाउंडेशनचे अध्यक्ष प्रकाश गिरे पाटील यांची व्याख्याने संपन्न झाली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांची शर्करातुला करून त्यांचे सत्कार करण्यात आले त्यावेळी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी काय केले पाहिजे याविषयी प्रसिद्ध विचारवंत पी बी वाघमारे वाघमारे यांचे सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रकाश गिरे पाटील यांची उपस्थिती होती ते बोलताना म्हणाले भाई केशवराव धोंडगे हे शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते,ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी आणि साहित्यिक तर होतेच परंतु त्यांनी सामाजिक,सांस्कृतिक व राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात केलेले कार्य उल्लेखनीय ठरते. कंधारच्या मातीत जन्माला आलेल्या भाई केशवराव धोंडगे उत्तुंग कर्तृत्व- प्रभावी परखड वक्तृत्व व सर्वसामान्य माणसाचा आवाज बुलंद करणारे कणखर नेतृत्व होते म्हणून त्यांना मन्याडचा वाघ म्हणून राज्यभर परिचित होते आताच्या काळात भाई केशवराव धोंडगे यांच्यासारखे निष्ठावान नेतृत्व पुन्हा होणे नाही असे प्रतिपादन व्याख्याते गिरे पाटील यांनी केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक भगवान पवळे यांनी प्रास्ताविक व्यक्त केले तर विवेक बुरपले सर,एकाळे सर यांनी मनोगत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री बामणे यांनी अध्यक्ष भाषण केले प्रमुख पाहुणे म्हणून शालेय समितीचे अध्यक्ष रोहित पाटील शिंदे उपाध्यक्ष राजेश बुरपल्ले प्राथमिक विभाग शालेय समितीचे अध्यक्ष साहेबराव शिंदे शालेय समिती सदस्य राम मंदावाड तसेच पालक प्रतिनिधी म्हणून गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक यावेळी उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुजरवार सर यांनी केले कार्यक्रमाचे आभार डॉ. सुजाता कांबळे यांनी मानले.

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१३ जुलै -**

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे १४ जुलै २०२५ रोजी नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

सोमवार १४ जुलै रोजी सकाळी ११.३० वा. नेताजी सुभाषचंद्र बोस आर्टस, कॉमर्स ण्ड सायन्स महाविद्यालय, येथे आगमन व कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १ वा. शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. दुपारी १.१० वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी ३.५० वा. शंकरराव चव्हाण सभागृह, स्टेडियम जवळ, ना दुपारी ३.५५ वा. शंकरराव चव्हाण सभागृह येथे आगमन. दुपारी ४ वा. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार-२०२५ सोहळयास उपस्थिती. सायं. ६.०५ वा.वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## बारड येथे साहेबराव बापू यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि.१३ जुलै -**

स्वातंत्र्य सेनानी तथा माजी आमदार स्व. साहेबराव देशमुख बारडकर यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या समृतीस अभिवादन करण्यात आले. बारड नगरीत स्वातंत्र सैनिक समारकात दिनांक ११ जुलै रोजी पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले इंजि. सुरेश देशमुख, माजी उपसभापती सुनील देशमुख, अँड संदीप देशमुख, यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गोविंदराव शिंदे नागेलीकर, माजी नगराध्यक्ष राजबहादुर पोतवार, यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी बापूंच्या जीवन चरित्रावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले आहे मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्यातील उमरी बँक लूट, पाटनुरचा जंगल सत्याग्रह यावर प्रकाश टाकण्यात आला आहे यावेळी पंचक्रोशीतील चहात्यांनी पुष्प अर्पण केले.

साहेबराव बापू अमर रहे या घोषणांनी परिसर फुलून गेला होता. गुरुवर्य गंगाधर स्वामी यांनी विधी परंपरेनुसार अभिवादन सोहळा पार पडला. यावेळी माजी सैनिक विभागीय संघटक लक्ष्मण देऊदे, संचालक कैलास दाड,



कॉंग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, स्वामी विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, माजी उपसरपंच बाळासाहेब देशमुख, सरपंच प्रतिनिधी शिवाजी ब्रुडे, विलासराव देशमुख, प्रभाकर आठवले, शिवसेना जिल्हा उपप्रमुख माणिक लोमटे उपसरपंच प्रदीप देशमुख, उत्तमराव लोमटे, आकाश सोनटक्के, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष, सतीश व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य राहुल आठवले, गजानन कत्रे, सेवानिवृत्त वनाधिकारी किसनराव देशमुख, श्रीराम कोरे, नरसिंग आठवले, दशरथ आडे, उत्तम पवार, पंजाब राठोड, गजानन लोमटे, दिगंबर लखे, आनंदा पवार, सटवाजी पंडागळे, अशोक गव्हाणे, रामेश्वर कोरबनवाढ, प्रेमचंद सावरकर, अवधूत श्रीजिरे, गोविंद बने, गोविंद माळकोटे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते

## लोह्यात वर्षावासानिमित्त बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि.१३ जुलै -**

शहरांमध्ये भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये वर्षावासानिमित्त क्रांतीसुर्य बुद्ध विहार व ज्ञानदीप बौध्द विहारात डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या पवित्र धम्म ग्रंथांचे वाचनाला प्रारंभ करण्यांत आले

आषाढ पौर्णिमेच्या दिवशी क्रांतीसुर्य बुद्ध विहारात भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथ वाचनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी नगराध्यक्षा त्रिशलाबाई विक्रम कांबळे यांच्या हस्ते मेणबत्ती प्रज्वलित करून करण्यात आले तर ज्ञानदीप बौध्द विहार येथील पवित्र ग्रंथ वाचनाच्या कार्येक्रमाची विहार कमेटीचे अध्यक्ष सुभाष ढवळे,ज्ञानोबा हानवते, उपाध्यक्ष दयानंद ढवळे, आर जी वाघमारे,डी. एन कांबळे ,कचरे यांच्या हस्ते ज्ञानज्योत पेटवून भगवान बुध्द, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतीमेला पुष्प अर्पण करुन ग्रंथ वाचनास प्रारंभ झाला.क्रांतीसुर्ये बौध्द विहार या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे ,लोहा तालुक्याचे अध्यक्ष बापूसाहेब कापुरे, सरचिटणीस धोंडीबा यानभुरे यांची प्रमुख उपस्थिती होती तर ज्ञानदीप बौध्द विहार यां ठिकाणी गौतम गोडबोले, प्रा.धनंजय सोनकांबळे, ज्ञानोबा ढवळे,तुकाराम गायकवाड, सिध्दांर्थ गायकवाड,माजी सैनिक हानवते ,लिंबाजी भावे, गोविंद कांबळे,दिंगाबर बुध्दे यांची उपस्थिती होती.

क्रींतीसुर्य बौध्द विहारात ग्रंथ वाचनाच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमचे व ग्रंथाचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले नंतर सामुदायिक रित्या त्रिसरण पंचशील घेण्यात आले. जिल्हा सरचिटणीस रत्नाकर महाबळे यांनी वर्षावासाचे महत्त्व ग्रंथ वाचनास प्रारंभ करून ग्रंथ वाचन कार्यक्रमाचा शहरातील सर्व बौद्ध उपासक, उपासिका यांनी लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी हरी धुतमल, वैशाली धुतमल, कोकरे ताई, सुमनबाई कापुरे, यांच्यासह उपासक उपासिका उपस्थित होते.

## राज्यपाल हरीभाऊ बागडे नेसुबो महाविद्यालयात देणार भेट

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१३ जुलै -**

राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे हे दि.१४ जुलै सोमवार रोजी सकाळी ११:३० वाजता अभिनव भारत शिक्षण संस्था संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयास सदिच्छा भेट देणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे यांनी दिली.

प्रमुख अतिथी म्हणून माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खा. अशोक चव्हाण, खा.डॉ. अजित गोपछडे, संस्थेच्या सचिव अ‍ॅड. वनिता जोशी, कोषाध्यक्ष कैलासचंद काला, प्राचार्य डॉ. एम. वाय. कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ . कल्पना कदम, उपप्राचार्य डॉ.अर्चना भवानकर, समन्वयक डॉ. मनीष देशपांडे यांची उपस्थिती राहणार आहे.

याप्रसंगी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सत्कार होणार आहे. त्याबरोबरच राज्यपाल हरीभाऊ बागडे महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी संवाद साधणार आहेत.

दरम्यान राज्यपाल हरीभाऊ बागडे शहरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची चर्चा करणार आहेत.अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब पांडे यांनी दिली.

## भरधाव क्रूझरच्या धडकेत गाय ठार

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि.१३ जुलै -**

शहरातील बसस्थानकासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील राष्ट्रीय महामार्गावर एका गाईला किनवटकडून पुसदच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या एका क्रुझर वाहनाने समोरासमोर जबर धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या गाईचा तडफडून जागीच मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सायंकाळी साडेसहा ते सात वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने चारचाकी वाहन व चालक मात्र सुखरूप बचावले.

या घटनेमुळे राष्ट्रीय महामार्गावर मुक्त संचार करणाऱ्या मोकाट जनावरां मुळे होणाऱ्या अपघाताचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नुकताच एका मोकाट वळुचा स्विफ्ट डिझायर कारने दिलेल्या धडकेत झालेल्या दुर्दैवी मृत्यूच्या अपघाताच्या घटनेनंतर आठवडाभरात आज घडलेल्या एका दुसऱ्या अपघाताच्या घटनेत झालेल्या सदरील गाईच्या दुर्दैवी मृत्यूमुळे नगरपंचायत समोर या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

## माधव पावडे यांची राष्ट्रवादीच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१३ जुलै -**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी युवा नेतृत्व पावडे यांची आज नियुक्ती करण्यात आली आहे. माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते माधव पावडे यांना आज नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.



उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे तत्कालीन युवासेना जिल्हाध्यक्ष माधव पावडे यांनी काही महिन्यांपूर्वीच आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश केला होता. आ. चिखलीकर यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पावडे यांचे जिल्हाभरात असंख्य युवा कार्यकर्ते आहेत. त्यांचे संघटनही मजबूत राहिले आहे. त्यामुळे माधव पावडे यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती देण्यात येत असल्याचे आ. चिखलीकर यांनी यावेळी सांगितले. नियुक्ती कार्यक्रमात माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे, प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी आमदार अविनाश घाटे, नांदेड शहर जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, राष्ट्रवादी काँग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, उत्तरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, प्रदेश उपाध्यक्षा सौ. मीनलताई खतगावकर, नेताजी पालकर, प्रा. नानवटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

पावडे यांची जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेससह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## श्रावणमासानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, दि.१३ जुलै -**

येथील श्री परमेश्वर मंदिरात भव्य अश्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रावणमासात या भक्तीमय सोहळ्याची पर्वणी हिमायतनगरवासीयांना अनुभवयाला मिळणार आहे.



पिंपळगाव दत्त संस्थानचे बालयोगी प. पु. व्यंकटस्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २५ शुक्रवारपासून अखंड ओम नाम शिवम जप साधना प्रारंभ होणार आहे. हा जप दि. २६ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. तर २७ ऑगस्ट रोजी जप समाप्ती होणार आहे. यामध्ये सकाळी ६ ते सायंकाळी ६ महिला भगिनींचा सहभाग तर सायंकाळी ६ ते सकाळी ६ पुरूष भक्त सहभाग घेणार आहेत. दुपारी २ ते ५ या वेळेत संगीत भागवत

कथा दि. २७ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान सादर होणार आहे. यामध्ये प्रवक्ता हभप भागवताचार्य प.पु. विदर्भ केशव स्वामी सारंग चैतन्य महाराज, अमरावती यांचा सहभाग राहणार आहे. त्याचबरोबर भव्य संगीतमय संत चरित्रकथा दि. ५ ऑगस्ट मंगळवारपासून सुरूवात तर ११ ऑगस्ट सोमवारपर्यंत चालणार आहे. १२ ऑगस्टला समाप्ती होणार असून यामध्ये कथा प्रवक्तया म्हणून स्मितताई आजेगावकर, पुणे यांचा उपदेश लाभणार आहे. त्याच बरोबर संगीतमय शिवपुराण कथाही होणार आहे. दि. १४ ऑगस्ट गुरूवारपासून सुरूवात तर, २० ऑगस्टपर्यंत चालणार आहे. दुपारी २ ते ५ या वेळेत सादर होणाऱ्या शिवपुराण कथेचे विश्लेशन प.पु. बालयोगी गजेंद्र स्वामी महाराज मधापुरी हे करणार आहेत. वरील सोहळ्याची सांगता महाप्रसादाने होईल.

# कोणी पक्षात घेतो का ? कोणी पक्षात.!

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि.१३ जुलै -**

मागील तीन महिन्यांपासून किनवट-माहूर विधानसभा क्षेत्रात एकाच गटाच्या राजकीय पक्षप्रवेशाच्या चर्चा चांगल्याच रंगात आहेत. दर आठवड्याला वेगवेगळ्या तारखा, नवीन राजकीय गोटात जाण्याचे अंदाज, नेतेमंडळींची संभाव्य यादी, स्थानिक आणि जिल्हास्तरीय लॉबीचा खेळ... सर्व काही इतक्या वेळा चर्चेत आले आहे की, सामान्य नागरिक मात्र या 'सस्पेन्स'ने पुरते कंटाळले आहेत.

कधी म्हणे मुंबईत प्रवेश होणार, तर कधी नांदेडला पत्रकार परिषद होणार. एकदा सांगितलं जातं राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार, तर दुसऱ्याच आठवड्यात



अजितदादांनी हरकत घेतली अशी बातमी. मग लगेच दुसऱ्या दिशेने वळण घेऊन भाजपमध्ये प्रवेश निश्चित झाला अशी कुजबुज. परंतु भाजपमध्ये स्थानिक गटांचे गणित जुळवताना वरिष्ठ नेत्यांशी मतभेद निर्माण झाले, अशी चर्चा सुरु झाली. अशा प्रकारे नेहमीच पक्षप्रवेश 'उद्याच्या' वाटेवर राहिला! या गोंधळात सर्वसामान्य कार्यकर्ते आणि नागरिक हैराण झाले आहेत. कोणी तरी एकदा यांना पक्षात घ्या, म्हणजे हे नाटक तरी थांबेल, अशी थेट विनंती काही गावकऱ्यांनी सोशल मीडियावरून व विविध बैठकीत व्यक्त केली आहे. ही प्रतिक्रिया राजकीय थकव्याची जिवंत उदाहरण बनली आहे.

दरम्यान, अलीकडेच संबंधित नेत्याने आपल्या पूर्वाश्रमीतील पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या घरी भेट दिली. निरोप समारंभाच्या त्या भेटीत जुने दिवस आठवणीत ठेवत भावनिक क्षण सामायिक करण्यात आले. आता आम्ही जातो, आमचा नमस्कार घ्या अशी भावना बोलून दाखवण्यात आल्याने या गटाच्या प्रस्थानावर शिक्कामोर्तब झाले असल्याची माहिती समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर, आगामी १५ जुलै किंवा १७ जुलै रोजी अखेरचा आणि निर्णायक पक्षप्रवेश होणार, अशी शक्यता वर्तवली जात आहे. पक्षप्रवेशाच्या या अखेरच्या दोन मुहूर्तांच्या चर्चेने आता पुन्हा एकदा तालुक्यातील राजकीय वर्तुळात उत्सुकता वाढवली आहे.

या बहुचर्चित प्रवेशामुळे तालुक्याच्या राजकारणात अनेक समिकरणे बदलतील, हे निश्चित आहे. पण एक गोष्ट मात्र खरी नागरिक आता या चर्चांपेक्षा कृतीवर अधिक विश्वास ठेवू लागले आहेत. त्यामुळे येणाऱ्या काही दिवसांत जर खरोखरच हा पक्षप्रवेश झाला, तर तीन महिन्यांच्या 'पक्षप्रवेशगाथेला' अखेर पूर्णविराम मिळेल!